रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

वर्ष १७ • अंक १५४

www.ramprahar.com

शुक्रवार, २० डिसेंबर २०२४ • पाने ८ • किंमत ₹२

## अंतरंग

गेट वे ते मांडवा चालणाऱ्या बोटींची सुरक्षा तपासणी/२

ई-रिक्षासंदर्भात माथेरानकर मुख्याधिकाऱ्यांच्या भेटीला/५

जिल्हास्तरीय महिला कबड्डी स्पर्धेत किहीम संघ विजेता/८

## उपराष्ट्रपतींविरोधातील अविश्वास प्रस्ताव फेटाळला



**नवी दिल्ली :** सध्या सुरू असलेल्या संसदेच्या हिवाळी अधिवेशनादरम्यान राज्यसभेमध्ये काँग्रेसने सभापती जगदीप धनखड यांच्याविरोधात अविश्वास प्रस्ताव आणला होता. हा अविश्वास प्रस्ताव फेटाळून लावण्यात आला आहे. देशाचे उपराष्ट्रपती हे राज्यसभेचे पदसिद्ध सभापती असतात. राज्यसभा सभापतींविरोधात अविश्वास प्रस्ताव आणला गेल्यास त्यावर सभागृहात चर्चा होते, मात्र नोटिसच फेटाळून लावली गेल्याने आता सभागृहात चर्चा होणार नाही. उपसभापती हरिवंश यांनी अविश्वास प्रस्तावावार निर्णय देताना सांगितले की, वैयक्तिक पूर्वग्रह ठेवून आणण्यात आलेल्या या नोटिसीमध्ये तथ्यांचा अभाव आहे. तिचा उद्देश केवळ प्रसिद्धी मिळवणे एवढाच आहे. ही नोटिस म्हणजे सर्वात मोठ्या लोकशाहीमधील उपराष्ट्रपतींच्या उच्च घटनात्मक पदाला जाणीवपूर्वक अपमानित करण्याचा केलेला प्रयत्न होता.

# अधिवेशन संपताच 'लाडक्या बहिणीं'ना लाभ

## नवीन निकष न लावता योजना सुरू ठेवणार -मुख्यमंत्री

**नागपूर : प्रतिनिधी**

राज्यात महायुती सरकार स्थापन झाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी (दि. १९) पहिल्यांदाच विधानसभेत भाषण करत विविध मुद्द्यांवर आपली भूमिका मांडली. या वेळी त्यांनी सरकारच्या लाडकी बहीण योजनेबाबत उपस्थित केल्या जाणाऱ्या शंका दूर करत नवीन कोणतेही निकष न लावता ही योजना आम्ही सुरू ठेवणार आहोत, अशी माहिती दिली तसेच या योजनेतील लाभार्थ्यांच्या बँक खात्यात डिसेंबर महिन्याचा हप्ता हे अधिवेशन संपताच जमा केला जाईल, असेही स्पष्ट केले.



सभागृहात देवेंद्र फडणवीस म्हणाले की, कोणीही कसलीही शंका मनात ठेवू नये. आम्ही जी जी आश्वासने दिली आहेत, ज्या ज्या योजना सुरू केल्या आहेत, त्यातील कोणतीही योजना बंद होऊ देणार नाही. ज्या लाडक्या बहिणींनी विधानसभा निवडणुकीत महायुतीवर भरभरून प्रेम दाखवले त्यांच्या बँक खात्यात आम्ही हे अधिवेशन संपल्यानंतर डिसेंबर महिन्याचा हप्ता जमा करणार आहोत.

लाडकी बहीण योजनेला नवीन निकष लावून लाभार्थ्यांची संख्या कमी केली जाईल, असा आरोप सरकारवर केला जात होता. हा आरोप मुख्यमंत्री फडणवीस यांनी खोडून काढला आहे. या योजनेसाठी नवीन कोणतेही निकष लावलेले नाहीत. फक्त काही लोकांनी चुकीच्या पद्धतीने लाभ घेतल्याचे लक्षात येत आहे. काहींनी चार-चार बँक खाती तयार करून फायदा घेतला आहे.

समाजात जसे चांगल्या प्रवृत्तीचे लोक असतात, तसे काही वाईट प्रवृत्तीचेही लोक असतात. त्यामुळे अशा लोकांनी फायदा घेऊ नये याची आम्ही काळजी घेऊ, कारण हा जनतेचा पैसा आहे. मागच्या काळात आमच्या लक्षात आले की, पुरुषानेच नऊ खाती काढून लाडकी बहीण योजनेचा फायदा घेतला. आता या पुरुषाला लाडकी बहीण म्हणायच कसे? लाडका भाऊदेखील म्हणून शकत नाही. कारण बहिणींच्या पैशावर डल्ला मारणारा भाऊ लाडका असू शकत नाही, असा टोला मुख्यमंत्र्यांनी लगावला.

दरम्यान, महायुतीने शेतकरी, युवा, ज्येष्ठ, समाजातील वंचितांच्या संदर्भातील दिलेली आश्वासने आम्ही पूर्ण करणार आहोत, अशा शब्दांत मुख्यमंत्री फडणवीस यांनी सर्व समाजघटकांना आश्वस्त केले.

### सरकारकडून पैशांची तरतूद

*राज्य सरकारने काही दिवसांपूर्वीच महिला व बालविकास विभागासाठी २,१५५ कोटी रुपये तरतूद केली असून यात लाडकी बहीण योजनेसाठी १,४०० कोटी रुपये राखून ठेवले आहेत. लाडकी बहीण योजनेत २.३४ कोटी महिला लाभार्थ्यांना जुलै ते नोव्हेंबर या कालावधीपर्यंत ७,५०० रुपये आधीच देण्यात आले आहेत. महिलांना लाडकी बहीण योजनेचे डिसेंबर महिन्याचे पैसे मिळालेले नसल्याने पुरवणी मागण्यांत तरतूद केलेली ही रक्कम डिसेंबरचे पैसे देण्यासाठी वापरली जाईल.*

# नव्या अनधिकृत व्यापार जिहादवर कडक कारवाई करा

## आमदार प्रशांत ठाकूर यांची नागपूर अधिवेशनात जोरदार मागणी

**नागपूर : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका हद्दीत अनधिकृत आठवडा बाजार व हातगाड्यांच्या रूपाने 'नवा अनधिकृत व्यापार जिहाद' पुकारण्यात आला आहे. या अनधिकृत व्यापार जिहादवर कडक कारवाई करा, अशी जोरदार मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी नागपूर येथे सुरू असलेल्या विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात केली.



आमदार प्रशांत ठाकूर यांनी सभागृहात हा विषय मांडताना अनधिकृत आठवडा बाजार व हातगाड्यांमुळे नागरिकांना होणारा नाहक त्रास विषद केला. त्यांनी आपल्या औचित्याच्या मुद्द्यातून सांगितले की, पनवेल विधानसभा मतदारसंघात पनवेल महानगरपालिका हद्दीमध्ये ठिकठिकाणी आठवडा बाजार मोठ्या प्रमाणात सुरू आहे. दररोज महापालिका हद्दीतील कुठल्याही शहरामध्ये आठवडा बाजार भरवले जातात. कुठलीही कायदेशीर परवानगी न घेता अवैधपणे व दादागिरीने हे बाजार चालवले जातात आणि त्याकडे हेतुपुरस्सर दुर्लक्ष होत आहे. त्याचबरोबर हातगाड्यांचे मोठ्या प्रमाणात पेव फुटून या हातगाड्यांनी शहरातील प्रमुख रस्ते व्यापले आहेत आणि त्यामुळे स्थानिक नागरिक व अधिकृत व्यवसायिक तक्रार करत आहेत, मात्र महापालिकेच्या माध्यमातून तकलादू स्वरूपाची कारवाई केली जाते. या हातगाड्यांवर अनधिकृत धंदेसुद्धा चालवले जातात. त्यामुळे वाहतुकीला अडथळे होतात अशा प्रकारच्याही तक्रारी वाढत चालल्या आहेत. त्याचबरोबर हातगाड्यांमार्फत आठवडा बाजारात मोठ्या प्रमाणात बांगलादेशी लोकं व्यवसाय करत असल्याचे निदर्शनास आले आहे, असेही त्यांनी सभागृहात अधोरेखित करून या विषयावरही शासनाचे लक्ष वेधले.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी पुढे सांगितले की, बांगलादेशात हिंदूंवर अत्याचार होत आहेत आणि त्याचवेळेला येथे कायद्यानुसार परवानग्या, कर भरणाऱ्या, आर्थिक गुंतवणूक, कर्ज घेऊन व्यवसाय करणाऱ्या अशा व्यावसायिक नागरिकांवर मात्र अन्याय होत आहे आणि त्यामुळे या व्यावसायिकांना व्यवसाय करणे कठीण झाले आहे. एकूणच अनधिकृत आठवडा बाजार व हातगाडीमुळे नवा अनधिकृत व्यापार जिहाद पुकारला गेला आहे. त्याच्यावर कायद्याचा बडगा उगारण्याची आवश्यकता आहे व त्या अनुषंगाने शासनाने महापालिकेला तातडीने कारवाई करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी त्यांनी औचित्याच्या मुद्द्याद्वारे विधानसभेत केली.

## निवडक

### एक देश, एक निवडणूक विधेयक आता 'जेपीसी'कडे

**नवी दिल्ली :** लोकसभेत मंजूर झालेले एक देश, एक निवडणूक विधेयक संयुक्त संसदीय समितीकडे (जेपीसी) पाठवण्यात आले आहे. या समितीमध्ये ३१ सदस्यांचा समावेश आहे. यापैकी २१ सदस्य लोकसभेतील, तर १० राज्यसभेतील आहेत. संसदीय समितीत या विधेयकावर चर्चा होईल आणि सर्व पक्षांची मते ऐकून घेतली जातील.

### मुंबई केंद्रशासित प्रदेश करा; काँग्रेस आमदाराची मागणी

**बंगळुरू :** महाराष्ट्र-कर्नाटक सीमाभागातील बेळगावमध्ये वाद सुरू असतानाच कर्नाटकच्या एका काँग्रेस आमदाराने आता थेट मुंबईला केंद्रशासित प्रदेश करण्याची मागणी विधानसभेच्या हिवाळी अधिवेशन केली आहे. आमदार लक्ष्मण सवदी यांनी बेळगाव सीमाभाग केंद्रशासित करायचा असेल, तर मुंबईदेखील केंद्रशासित करावी असे म्हटले आहे. यावर महाराष्ट्रातून टीका होत आहे.

# विधान परिषदेच्या सभापतीपदी राम शिंदेंची बिनविरोध निवड

**नागपूर : प्रतिनिधी**

विधान परिषदेचे सभापती म्हणून भाजपचे प्रा. राम शंकर शिंदे यांची गुरुवारी (दि. १९) आवाजी मतदानाने एकमताने निवड करण्यात आली. या संदर्भात उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी सभागृहात घोषणा केली.



सभापती निवडीचा प्रस्ताव विधान परिषद सदस्य श्रीकांत शिंदे, उमा खापरे, शिवाजीराव गर्गे यांनी सभागृहात मांडला. या प्रस्तावाला सदस्य मनीषा कायंदे, अमोल मिटकरी, ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी अनुमोदन दिले. प्रा. राम शिंदे यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार व एकनाथ शिंदे यांनी सभापतींच्या खुर्चीवर बसून पदभार सोपविला. बिनविरोध निवड केल्याबद्दल मुख्यमंत्री फडणवीस व नवे सभापती शिंदे यांनी विरोधी पक्ष सदस्यांसह सर्व सदस्यांचे आभार मानले.

अडीच वर्षांहून अधिक काळ रिक्त असलेल्या विधान परिषदेच्या सभापतीपदाच्या निवडणुकीसाठी महाविकास आघाडीने उमेदवार दिला नव्हता. शिंदे यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची बुधवारीच निवड निश्चित झाली होती. शिंदे यांच्या नावाची गुरुवारी औपचारिक घोषणा करण्यात आली. विधान परिषदेचे माजी सभापती रामराजे नाईक-निंबाळकर यांची ७ जुलै २०२२ रोजी सदस्यत्वाची मुदत संपुष्टात आल्यापासून सभापतीपद रिक्त होते.

# राहुल गांधींकडून धक्काबुक्कीत भाजप खासदार जखमी

## पंतप्रधान नरेंद्र मोदींकडून विचारपूस

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



इंडिया आघाडीने गुरुवारी (दि. १९) संसद परिसरात केलेल्या आंदोलनादरम्यान भाजपचे खासदार प्रतापचंद्र सारंगी जखमी झाले आहेत. त्यांनी लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यामुळे त्यांना दुखापत झाल्याचा आरोप केला आहे.

संसद भवनात घडलेल्या या सर्व प्रकारावर बोलताना भाजपचे खासदार प्रताप चंद्रसारंगी म्हणाले की, मी पायऱ्यांवर उभा होतो. तेव्हा राहुल गांधी यांनी खासदार मुकेश राजपूत यांना धक्का दिला. त्यामुळे ते माझ्या अंगावर पडल्यानेही मीसुद्धा जखमी झालो.

इंडिया आघाडीने केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचा निषेध करण्यासाठी केलेल्या आंदोलनादरम्यान ही घटना घडली. या घटनेत प्रतापचंद्र सारंगी आणि मुकेश राजपूत हे खासदार जखमी झाले असून या दोघांनाही रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जखमी खासदारांची विचारपूस केली.

# भारतरत्न डॉ. बाबासाहेबांच्या सन्मानात भाजप मैदानात!

**मुंबई : प्रतिनिधी**

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा काँग्रेसने अपमान केल्याचे सांगत भाजप युवा मोर्चाच्या कार्यकर्त्यांनी गुरुवारी (दि. १९) मुंबईतील काँग्रेसच्या मुख्यालयात जाऊन निषेध आंदोलन केले. या वेळी पोलिसांनी लाठीचार्ज करीत जमावाला पांगवले.

**युवा मोर्चाचे मुंबईत आंदोलन**

संविधानाच्या ७५ वर्षांच्या गौरवशाली इतिहासाच्या निमित्ताने लोकसभा आणि राज्यसभेत सर्व खासदारांची चर्चा झाली. या चर्चे दरम्यान केंद्रीय गृहमंत्री अमित शाहांकडून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अपमान झाल्याचा आरोप काँग्रेसकडून करण्यात आला. या आरोपाला ना. शाहांनी प्रत्युत्तरही दिले. याचे पडसाद मुंबईत उमटले.

काँग्रेसने नेहमी संविधानाचा अपमान केलाय. काँग्रेसने डॉ. आंबेडकरांचा निवडणुकीत पराभव करण्यासाठी प्रयत्न केले होते, असे म्हणत मुंबईतील किल्ला कोर्टाच्या समोर असलेल्या काँग्रेस कार्यालयात भाजप युवा मोर्चा मुंबई अध्यक्ष तेजिंदर सिंग तिवाना यांच्या नेतृत्वाखाली तीव्र आंदोलन करण्यात आले.

आक्रमक आंदोलनकर्त्यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेबांच्या सन्मानात भाजप मैदानात अशा पद्धतीचे पोस्टर घेऊन काँग्रेस नेते राहुल गांधी, सोनिया गांधी आणि प्रियंका गांधी यांच्या पोस्टरवर शाई फेकली. या वेळी दोन्ही बाजूचे कार्यकर्ते आमनेसामने आले. पोलिसांनी लाठीचार्ज करून जमावाला पांगवले.

# नौदलाच्या 'त्या' स्पीड बोटीची तज्ज्ञांकडून होणार तपासणी

**मुंबई :** गेट वे ऑफ इंडिया येथून घारापुरीकडे निघालेल्या 'नीलकमल' प्रवासी बोटीला नौदलाच्या स्पीड बोटने धडक दिल्याप्रकरणी पोलिसांनी तपासाला सुरुवात केली आहे. तज्ज्ञांच्या मदतीने अपघातग्रस्त बोटीची तपासणी करण्यात येणार असून यात मेरिटाईम बोर्डाचीही मदत घेण्यात येणार आहे. याशिवाय नौदलाशी पत्र व्यवहार करण्यात येणार आहेत.

पोलिसांनी तक्रारदारासह १० जणांचे जबाब नोंदवले असून त्यात इतर प्रवाशांचाही समावेश आहे. या प्रकरणी कुलाबा पोलीस ठाण्यात नौदलाच्या स्पीड बोटीचा चालक आणि इतर संबंधित व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. **(पान २ वर..)**

# रामबाग उद्यानाचा रविवारी वर्धापन दिन सोहळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

**पारंपरिक लोकगीते व कोळीगीतांचा बहारदार कार्यक्रम**

दुबईच्या धर्तीवर पनवेल तालुक्यातील न्हावेखाडी येथे उभारण्यात आलेल्या 'रामबाग' या निसर्गरम्य उद्यानाच्या वर्धापन दिन सोहळ्यानिमित्त रविवारी (दि. २२) श्री सत्यनारायण महापूजा व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्याला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, पनवेल विधासभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर, उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी, विधान परिषदेचे आमदार विक्रांत पाटील, कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील यांच्यासह अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या संकल्पनेतून महाराष्ट्राच्या नावलौकिकात भर टाकणारी अशी रामबाग साकारली आहे. १४ एकर जागेतील या उद्यानात भव्य आणि सुरेख प्रवेशद्वार, निसर्गरम्य हिरवळीसह विविध प्रकारच्या फुलझाडांच्या विविध रचना, तलाव, विद्युत रोषणाई, पदपथ, चिरेबंदी बांधकाम, आसन व्यवस्था, लहान मुलांसाठी खेळणी, पाळणे, डबल हर्ट आणि स्टोन सेल्फी पॉईंट, मचवा, पाण्याचे कारंजे अशा सर्व बाबी आकर्षक आणि मनमोहक आहेत. सायंकाळी या उद्यानाचे रूप बदलते, त्या वेळी असणारी विद्युत रोषणाई अक्षरशः डोळ्यांचे पारणे फेडणारी आहे. त्यामुळे राज्यातील निसर्गप्रेमी या ठिकाणी मोठ्या संख्येने भेट देत आहेत. **(पान २ वर..)**



# महाराष्ट्र थेट परकीय गुंतवणुकीत पहिला

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची नागपूर अधिवेशनात माहिती

**नागपूर : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र थेट परकीय गुंतवणुकीत पहिल्या क्रमांकावर आहे. छत्रपती संभाजीनगर, जालना या ठिकाणीदेखील उद्योगाचे जाळे विकसित होत आहे. राज्यात वसुलीबाजांना थारा दिला नाही तर राज्याच्या प्रगतीचा वेग दुप्पट होईल. अशा वसुलीबाजांवर आता कठोर कायदेशीर कारवाई केली जाणार असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

महाराष्ट्रात १ जुलै २०२२ पासून ३ लाख ४८ हजार ७० कोटींची गुंतवणूक महाराष्ट्रात आली असून यामुळे २ लाख १३ हजार २६७ इतकी रोजगार निर्मिती होणार आहे. राज्यात १० मोठ्या प्रकल्पांना आपण मंजूरी दिली असून यामध्ये २ लाख ३९ हजार ११७ कोटींची गुंतवणूक तर ७९ हजार ७२० इतकी रोजगार निर्मिती अपेक्षित आहे. विदर्भातील ४७ मोठ्या प्रकल्पात १ लाख २३ हजार ९३१ कोटींची गुंतवणूक होऊन ६१ हजार रोजगार निर्मिती, मराठवाड्यात ३८ प्रकल्पात ७४ हजार ६४६ कोटी गुंतवणूक व ४१ हजार ३२५ रोजगार निर्मिती आणि उर्वरित महाराष्ट्रात १३६ प्रकल्पात १ लाख ४९ हजार ४९३ कोटींची गुंतवणूक होऊन १ लाख १० हजार ५८८ रोजगार निर्मिती होत आहे. यामुळे महाराष्ट्र थेट परकीय गुंतवणुकीत पहिल्या क्रमांकावर आहे.

> विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीमहाराष्ट्राच्या विकासाची दिशा आणि दृष्टीकोन स्पष्ट करताना सरकारच्या पुढील वाटचालीबाबत मनोदय व्यक्त करतांना सांगितले
> महाराष्ट्र आता थांबणार नाही...
> सोबत राहू एकदिलाने, घडवू महाराष्ट्र पुन्हा नव्याने,
> समृद्धीचा वेग कुणी रोखणार नाही, महाराष्ट्र आता थांबणार नाही...
> उद्योग, गुंतवणूक येतेय जोमात बेरोजगारांना देऊ रोजगाराची साथ
> तरुणाईचं स्वप्न कधी भंगणार नाही,
> महाराष्ट्र आता थांबणार नाही...
> रस्ते, पूल, रेल्वेचे धागे, सुखदायी प्रवासाचे स्वप्न होईल जागे,
> गतीला स्थगिती मिळणार नाही, महाराष्ट्र आता थांबणार नाही...
> विकासाच्या स्वप्नांसोबत सेतू अटल मुंबईच्या वेगासाठी आहे
> कोस्टल मराठी माणसाचे स्वप्न भंगणार नाही,
> महाराष्ट्र आता थांबणार नाही...
> जलयुक्त शिवार देईल नवजीवन, नदीजोड प्रकल्प फुलवतील नंदनवन
> राज्यात दुष्काळ कुठे दिसणार नाही
> महाराष्ट्र आता थांबणार नाही...
> पाणंद रस्त्यांनी जोडू शेतशिवार आनंदाचा शिधा देईल आधार
> उपाशी पोटी कुणी झोपणार नाही, महाराष्ट्र आता थांबणार नाही...
> लाडक्या बहिणींना मिळाला स्वाभिमान
> ज्येष्ठांना मोफत प्रवासातून सन्मान
> लाडक्या लेकी कधी दुःखी होणार नाही
> अन् महाराष्ट्र आता थांबणार नाही...
> असेल विरोधकांचे कमी संख्याबळ, सारे टिकवून ठेऊ लोकशाहीचे बळ
> कोणत्याही आमदाराचा मानसन्मान घटणार नाही महाराष्ट्र आता थांबणार नाही...
> **– मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

### मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा

मराठी भाषेला राजभाषेचा दर्जा छत्रपती शिवाजी महाराजांनी दिला. त्यानंतर केंद्रातील मोदी सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा संविधानानुसार दिला. यामुळे मराठी भाषेच्या प्रचार आणि प्रसारासाठी निधी मिळणार आहे. तसेच विद्वानांना दोन पुरस्कार मिळणार आहेत. प्राचिन ग्रंथांचा अनुवाद करण्यात

येणार आहे. या सर्व प्रयत्नांसह आपण आपली भाषा रूजविणार आहोत. आता न्यायालयाती निवाडे मराठीत उपलब्ध करण्यास सुरूवात होणार असल्याचेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत सांगितले.

### महाराष्ट्राला दुष्काळमुक्त करण्याचा संकल्प

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्यातील सिंचन क्षेत्र वाढविण्यासाठी गेल्या अडिच वर्षात १६७ प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता दिली असून यामुळे २५.२१ लक्ष हेक्टर जमिन सिंचनाखील येणार आहे. महाराष्ट्राला दुष्काळमुक्त करण्याचा संकल्प आम्ही केला असून नदीजोड प्रकल्प, जलयुक्त शिवार योजना आणि जलसिंचन प्रकल्प यासाठी उपयुक्त आहे. वैनगंगा-नळगंगा, नारपार-गिरणा, दमणगंगा-वैतरणा-गोदावरी, दमणगंगा-एकदरे असे नदी जोडप्रकल्प मार्गी लावणार असल्याने विकासाला गती मिळणार आहे. राज्यातील शेतकऱ्याचे जीवनमान उंचावण्यासाठी,



शेतकऱ्यांच्या पिकाला मुबलक पाणी उपलब्ध व्हावे यासाठी नदीजोड प्रकल्प महत्वाचे आहेत. यासाठी राज्य शासनाने जल आराखडा तयार केला आहे. राज्यात बांबू लागवडीला प्रोत्साहत देण्यात असून यामुळेदेखील शेतकऱ्यांना फायदा होणार आहे.

### मेट्रो प्रकल्प गतिमान

मुंबई, नागपूर, पुणे या शहरांमध्ये मेट्रोच्या कामाला अधिक गती देण्यात आली आहे. ही कामे पूर्ण झाल्यानंतर प्रवाशांचा प्रवास अधिक गतिमान होणार आहे. मुंबईत मेट्रो टप्पा ३ चे काम अंतिम टप्प्यात असून बीकेसी ते कुलाबा ही नवीन लाईफ लाईन होणार आहे. १७ लाख प्रवाशी प्रवास करणार आहेत. मे २०२५ पर्यंत ही लाईन खुली होईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

### शेतकऱ्यांकडून वीज बिल घेणार नाही

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्यात १६ हजार मेगावॅट सौर ऊर्जा निर्मितीचे प्रकल्प सुरू केले आहेत. आतापर्यंत ६६७ मेगावॅट वीज कार्यान्वित झाली. २०२६ पर्यंत १६ हजार मेगावॅट वीज कार्यान्वित करण्याचा प्रयत्न करणार आहे. शेतकऱ्यांकडून विजेचे बिल घेणार नाही. ९ लाख कृषीपंप आज आपल्याकडे उपलब्ध आहेत. मागेल त्याला सौरपंप आम्ही देणार असून ३ महिन्यात कनेक्शन देऊ असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. २०३० साली राज्यात ५२ टक्के उर्जा अपारंपरिक स्त्रोतातील असेल असेही त्यांनी सांगितले.

### वाढवण बंदर विकासाचे केंद्र

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, पालघर येथे ७६ हजार कोटी रुपये खर्च करून वाढवण बंदर करण्यात येत आहे. हे बंदर जेएनपीटीपेक्षा तीन पट मोठं असून वाढवण बंदरामुळे अनेक फायदे होणार. राज्याच्या देशाच्या विकासात वाढवण बंदरचे मोठे योगदान राहणार असून यामुळे अर्थव्यवस्थेला अधिक गती मिळणार असल्याचा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

### नाशिक येथे आयटी पार्क

नाशिक येथे आय टी पार्क विकसित करण्यात असून या कामासाठी वास्तू विषारदाची नेमणूक झाली आहे. लवकरच येथे अद्ययावत आयटी पार्क निर्माण केला जाईल. मुख्यमंत्री म्हणाले, राज्यातील जनतेने मोठ्या आत्मविश्वासाने जबाबदारी सोपवली आहे. ही जबाबदारी पूर्ण करण्यासाठी सर्वांनी एकत्रित काम करून राज्याला विकासात प्रथम क्रमाकांवर कायम ठेवूया.

# गेट वे-मांडवादरम्यान चालणाऱ्या बोटींची तपासणी



**अलिबाग : प्रतिनिधी**

मुंबईहून घारापुरीला जाणाऱ्या बोटीला झालेल्या दुर्घटनेनंतर प्रशासकीय यंत्रणा जाग्या झाल्या आहेत. गेट वे ऑफ इंडिया ते मांडवा दरम्यान चालणाऱ्या बोटींची मेरीटाईम बोर्ड आणि पोलीस प्रशासनाकडून गुरुवारी (दि. १९) सुरक्षा तपासणी करण्यात आली. बोटींवर प्रत्येक प्रवाशाला पुरतील येवढे लाईफ जॅकेट्स उपलब्ध आहेत अथवा नाही याची पडताळणी करण्यात आली.

मुंबईतील गेट वे ऑफ इंडीया येथून घारापुरीला जाणाऱ्या निलकमल या प्रवासी बोटीला बुधवारी सायंकाळी नेव्हीच्या स्पीड बोटने धडक दिली. या अपघातानंतर निलकमल बोटीला जलसमाधी मिळाली. या दुर्घटनेत १३ प्रवाशांचा मृत्यू झाला. तर ९८ जण जखमी झाले. या दुर्घटनेमुळे जल प्रवासी वाहतूक करणाऱ्या बोटीतील प्रवाशांच्या सुरक्षेचा मुद्दा प्रकर्षाने समोर आला आहे. क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी वाहतूक करणे, बोटींवर पुरेशा प्रमाणात लाईफ जॅकेट, रिंग बोयाज उपलब्ध नसते. जीर्ण आणि वयोमान झालेल्या बोटींचा प्रवासी वाहतुकीसाठी वापर करणे, बोटींची वाहतूक करताना नेमून दिलेल्या मार्गाचा अवलंब न करणे यासाठी मुद्दे समोर आले आहेत.

दरम्यान, बुधवारच्या दुर्घटनेनंतर प्रशासकीय यंत्रणांना जाग आली असून गुरुवारी पोलीस आणि मेरीटाईम बोर्डाकडून गेट वे ऑफ इंडिया ते मांडवादरम्यान चालणाऱ्या बोटींची कसून सुरक्षा तपासणी केली जात होती. प्रत्येक प्रवाशाला लाईफ जॅकेट घालूनच बोटीत बसण्याच्या सक्ती करण्यात आली होती. बोटींवर पुरेश्या प्रमाणात बचाव सामुग्री असल्याची खात्री केल्यानंतर बोटींना सोडले जात होते. बोट व्यवस्थापनाकडूनही प्रवासी क्षमतेचे काटेकोर पालन सुरू होते.

> **मांडवा येथून सुटणाऱ्या प्रत्येक बोटीवर प्रवाशांना आजपासून लाईफ जॅकेट घालण्याची सक्ती करण्यात आली आहे. त्याचबरोबर मंजूर प्रवासी क्षमतेपेक्षा एकही जास्त प्रवासी वाहतूक होणार नाही याची खात्री करूनच बोटी सोडल्या जाणार आहेत.**
> **–आशिष मानकर,**
> **बंदर अधिकारी, मांडवा**

मुंबईतील गेट वे ऑफ इंडिया ते अलिबाग तालुक्यातील मांडवादरम्यान जलप्रवासी वाहतूक सुरू असते. दररोज साडेतीन ते चार हजार प्रवासी या मार्गावरून प्रवास करतात. शनिवार रविवार आणि सुट्टीच्या दिवशी प्रवाशांची संख्या आठ ते दहा हजारांपर्यंत वाढते. त्यामुळे प्रवाशांची विशेष खबरदारी घेतली जात आहे.

# माणगाव एसटी आगाराचा भोंगळ कारभार; गाड्यांचे नियोजन नाही

**माणगाव : बातमीदार**

माणगाव एसटी आगारातून नियमित सुटणाऱ्या एसटीच्या फेऱ्या बंद केल्याने प्रवाशांचे अतिशय हाल होत आहेत.माणगाव एसटी आगाराच्या या भोंगळ कारभाराचा फटका माणगाव, साई आणि म्हसळ्याच्या प्रवाशांना बसला आहे. त्यामुळे प्रवासी वर्ग अतिशय संतप्त झालेला पहावयास मिळत आहे.

सुरक्षित प्रवासाचे ब्रीदवाक्य घेऊन १९५० सालापासून एसटीची बससेवा सुरू झाली. त्यानंतर गाड्यांची व कर्मचाऱ्यांची संख्या वाढत गेली. बस सेवेच्या माध्यमातून गाव तेथे एसटी अशा घोषणा देण्यात आली. राज्यातील प्रवाशांना प्रवासासाठी एसटी हा सुरक्षित पर्याय असला तरी गाव खेड्यातील प्रवाशांच्या बाबतीत एसटी प्रशासन उदासीन असल्याचे प्रकर्षाने जाणवते आहे.

एकीकडे प्रशासनाने महिलांना प्राधान्य देतं एस टी प्रवासामध्ये आरक्षण देवुन महिलांना अर्ध्या तिकिटाची बजावणी केली तर दुसरीकडे माणगाव सारख्या एसटी आगारातून नियमित सुटणाऱ्या एसटीच्या फेऱ्या बंद करून प्रवाशांचे अतिशय हाल करून टाकलेआहेत.मुंबई गोवा महामार्गावरील माणगाव हे तालुक्याचे ठिकाण असल्याकारणाने सर्व छोटी मोठी गावे त्याला जोडलेली आहेत. पण तेथे येण्या जाण्यासाठी गाड्यांची सोय नाही. खास करून म्हसळा ते माणगाव या मार्गावर प्रवास सतत प्रवासी असतात.

माणगावमध्ये द.ग.तटकरे कॉलेज, निकम कॉलेज व इंग्लिश माध्यमाच्या शाळा आहेत म्हसळा मार्गावरील चांदोरे, साई, विहूले, डोंगरोळी, सुर्ले, बोरले, नाईटने, मोरबा येथून येणारे विद्यार्थी भरपूर प्रमाणात असतात एक वाजता सुटणारी माणगाव–म्हसळा ही एसटी कधीच वेळेत नसल्याने विद्यार्थ्यांचे खूपच हाल होत आहेत.

माणगाव– म्हसळा दुपारी एक , तीन व संध्याकाळी ४ वाजता एसटीच्या लोकल फेऱ्या झाल्यानंतर मधल्या ४ ते ६ या वेळेत एकही लोकल एसटी सोडली जात नाही. त्यामुळे संध्याकाळी कामावरून सुटलेला नोकरवर्ग ४ वाजल्यापासून ६ वाजेपर्यंत एसटी स्थानकात फिरत असतो. यामध्ये विद्यार्थी, महिला वर्ग जास्त प्रमाणात असतात तरीही याची दखल आगार प्रमुख घेत नाहीत. चौकशी करण्यास जाणाऱ्या प्रवाशांना अधिकारी वर्ग स्पष्ट सांगत असतात की, मुंबईवरून येणाऱ्या गाड्यांना ट्राफिक असेल म्हणून एसटी वेळेत येणार नाही. तर काही वेळा उडवा उडवीची उत्तरे देऊन वेळ मारुन नेत आहेत.

अवेळी सुटणाऱ्या बसेसमुळे प्रवाशांना मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. शासनाने महिलांना दिलेल्या अर्ध्या तिकिटाचा बोजवारा वाजून वेळेअभावी खाजगी वाहनातून आवाच्या सव्वा पैसे देऊन प्रवास करावा लागत आहे. या सर्व गोष्टींकडे एसटी आगार प्रमुखांनी गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी प्रवाशांची मागणी आहे.

# भिवपुरी स्टेशनवरील उद्वाहन यंत्रणा सुरू

**कर्जत : प्रतिनिधी**

मध्य रेल्वे वरील भिवपुरी रोड रेल्वे स्थानकातील मुख्य फलाटावरील कर्जत आणि पुणे एन्ड कडे लिफ्ट बसविण्यात आली आहे. त्या लिफ्ट अनेक महिने कार्यान्वित करण्यासाठी भिवपुरी रोड प्रवासी संघटने कडून मागणी करण्यात येत होती .अखेर या दोन्ही लिफ्ट कार्यान्वित करण्यात आल्याने प्रवाशांनी समाधान व्यक्त केले.

मध्य रेल्वेच्या मेन लाईन वरील नेरळ आणि कर्जत स्थानकाच्या दरम्यान असलेल्या भिवपुरी रोड स्टेशन वर प्रवाशांच्या सोयीसाठी उदवाहन बसवण्याची अनेक वर्षे मागणी सुरु होती. मध्य रेल्वे माहिती अधिकार कार्यकर्ते पंकज ओसवाल व भिवपुरी रोड प्रवासी संघटनेने स्थानकातील लिफ्टसाठी दोन वर्षांपासून पाठपुरावा सुरु करण्यात येत होता. त्यानंतर स्थानकात कर्जत दिशेकडे आणि मुंबई दिशेकडे एक अशा दोन उदवाहन यांच्या कामाला सुरुवात झाली होती. मात्र तब्बल दोन वर्षे त्या दोन्ही लिफ्ट उभारण्याचे काम सुरु होते. शेवटी प्रवासी संघटना या सातत्याने आक्रमकपणे मध्य रेल्वे अधिकारी यांच्याकडे पाठपुरावा करीत होते. अखेर भिवपुरी रोड स्थानकातील उदवाहन कार्यान्वित झाल्या असून त्याबद्दल मध्य रेल्वे प्रवासी संघटना यांनी आनंद व्यक्त केला आहे

# टीएमसी कॉलेजचे ताम्हाणे येथे निवासी श्रमसंस्कार शिबिर



**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव येथील जे.बी.सावंत एजुकेशन सोसायटीचे टिकमभाई मेथा कॉमर्स कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाअंतर्गत भारतीय संविधानाचा हिरक महोत्सव, स्वच्छ भारत अभियान, सुदृढ भारत अभियान, भारतासाठी युवक या अभियानावर आधारित सात दिवसीय विशेष निवासी श्रमसंस्कार शिबिर २०२४ – २५ चे आयोजन तालुक्यातील ताम्हाणे गावात दि.१९ ते २५ डिसेंबर २०२४ दरम्यान करण्यात आले आहे

या शिबिराचे उदघाटन गुरुवार (दि.१९) रोजी सायंकाळी ४ वाजता महाविकास समितीचे सदस्य रामदास पुराणिक यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जिल्हा समन्वयक तुलसीदास मोकल, प्राचार्य हर्षल जोशी, ताम्हाणे पोलीस पाटील शशिकांत मोरे, ग्रामस्थ बळीराम धाडवे, सुरेश मोरे, चंद्रकांत धाडवे, अशोक जाधव, रामदास धाडवे, पांडुरंग मोरे, धोंडिराम पवार, महाविद्यालयाचे शिक्षकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारीवर्ग तसेच विध्यार्थी आदी उपस्थित होते. या वेळी सर्व उपस्थित मान्यवरांचे कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. जगदीश शिगवण यांनी व सहकारी शिक्षकांनी व विध्यार्थ्यांनी स्वागत केले.

सात दिवस चालणाऱ्या या शिबिरात विद्याध्यांना विविध विषयांवर मार्गदर्शनपर व्याख्यान होणार आहेत.अनेक मान्यवर मंडळी या शिबिराला भेट देणार आहेत.या शिबिराची कॉलेजचे प्राचार्य हर्षल जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. जगदीश शिगवण, प्रा.अशोक मोरे, प्रा.डॉ. नितीन मुटकुळे, प्रा.भारत पवार, ग्रंथपाल अमित बाकाडे, दिलीप ढेपे, संजय गायकवाड, महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारीवृंद तसेच राष्ट्रीय सेवा योजना विध्यार्थी स्वयंसेवक प्रतिनिधी पायल पतारे, प्रशांत मणवे, वृषाली उंडरे, वैभव माळी, रसिका पवार व सहकाऱ्यांनी तयारी केली आहे.

**पान १ वरुन**

## नौदलाच्या 'त्या' स्पीड बोटीची तज्ज्ञांकडून तपासणी

दरम्यान, या दुर्घटनेत दोन्ही बोटींवर प्रवासी आणि कर्मचारी अशा एकूण ११५ जणांना बचावकार्यात वाचवण्यात आले, मात्र यापैकी १४ जणांचा मृत्यू झाला असून चौघांची प्रकृती चिंताजनक आणि ९७ जणांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती देण्यात आली.

दुर्घटनेनंतर दोन प्रवासी बेपत्ता होते. यापैकी एका व्यक्तीचा मृतदेह गुरुवारी (दि. १९) नीलकमल बोटीतच सापडला असून त्याची ओळख पटविली जात आहे, तर दुसऱ्याचा शोध सुरू आहे.

## रामबाग उद्यानाचा रविवारी वर्धापन दिन सोहळा

न्हावेखाडी येथे म्हसेश्वर मंदिर या ठिकाणी अतिसुंदर असलेल्या या रामबाग उद्यानाच्या वर्धापन दिनानिमित्त रविवारी सायंकाळी ५.३० वाजता श्री सत्यनारायण महापूजा व महाप्रसाद, तर रात्री ८ वाजता पंचम निर्मित व गणेश भगत प्रस्तुत सुप्रसिद्ध अभिनेते पंढरीनाथ अर्थात पॅडी कांबळे आणि सोबत ७० कलाकारांचा संच असलेला 'महाराष्ट्राचे आम्ही मराठी' हा पारंपरिक लोकगीते व कोळीगीतांचा बहारदार कार्यक्रम होणार असून प्रवेश विनामूल्य आहे.

या कार्यक्रमाचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन रामबाग व्यवस्थापन कमिटीचे अध्यक्ष सागर ठाकूर, श्री म्हसेश्वर मंदिर कमिटी अध्यक्ष सी.एल. ठाकूर, न्हावे ग्रामपंचायतीचे सरपंच विजेंद्र पाटील यांनी केले आहे.

# मोहोपाडा येथे आरोग्य शिबिर

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

मोहोपाडा येथील अष्टविनायक हॉस्पिटलमध्ये शनिवारी (दि.२१) मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात तज्ज्ञ डॉक्टर उपस्थित राहून रुग्णांना मार्गदर्शन करणार आहेत.

या शिबिरात रँडम ब्लड शुगर (रक्तातील शर्करा), सीबीसी (संपूर्ण रक्तातील घटक), रक्तदाब, ईसीजी, एक्स रे (डॉक्टरांनी शिफारस केल्यास), ऑडिओमेट्री (श्रवण क्षमता तपासणी), बीएमआय, डोळयांची तपासणी आदी मोफत तपासण्या करण्यात येणार असल्याचे डॉ. अगरवाल यांनी सांगितले.

अधिक माहितीसाठी अष्टविनायक हॉस्पिटलचे विपणन मुख्य अधिकारी रुपेश यादव (९८३३१०४४८७) यांच्याशी संपर्क करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# जास्त प्रवासी नेणाऱ्या बोटींवर कारवाई करा

## आमदार मंदा म्हात्रे यांची मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

नुकतीच या प्रवासी बोटीला अपघात झाला. गेट वे ऑफ इंडियातून ही बोट घारापुरी येथे जात होती. या अपघातात १३ जण मृत्युमुखी पडले. या दुर्घटनेत मृत्यू झालेल्या मृतांच्या कुटुंबीयांसाठी राज्य सरकारकडून मदत जाहीर करून मृत्यू झालेल्या मृतांच्या कुटुंबीयांना योग्य ते न्याय देण्यात यावे अशी मागणी बेलापूर विधानसभा क्षेत्राच्या आमदार मंदा म्हात्रे यांनी नागपूर येथे सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनामध्ये औचित्याच्या मुद्याद्वारे मागणी केली. या वेळी नियम न पाळणाऱ्या मालवाहू बोटींवर तसेच जास्त क्षमतेने प्रवाशांना नेणाऱ्या बोटींवर कारवाई




करण्याची मागणी आमदार मंदा म्हात्रे यांनी केली.

आमदार मंदा म्हात्रे यांनी नागपूर येथे सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनामध्ये औचित्याच्या मुद्याद्वारे सभागृहात प्रश्न उपस्थित करत दोषींची चौकशी करुन त्यांच्यावर कठोर कारवाई करावी अशी मागणी केली आहे. नौदलाने फेरी बोट, मालवाहू जहाज व स्थानिक मच्छीमार बांधव यांच्या नौकांना जल मार्ग ठरवून दिले आहेत. त्याचबरोबर दिशा दर्शक बोये सुध्दा समुद्रात ठेवण्यात आले आहेत, परंतु या सर्व नियमांचा पालन करता प्रवासी फेरी बोट खलाशी आपल्या मर्जी प्रमाणे बोट चालवीत असतात. तसेच दिवाळे कोळीवाडा, वाशी गाव, ट्रॉम्बे कोळीवाडा, उरण कोळीवाडा, गव्हाण कोळीवाडा, माहुल कोळीवाडा, करंजा कोळीवाडा, अशा इतर परिसरामधील कोळीवाड्यातील कोळीबांधव हे मच्छीमार करीत असताना मालवाहू जहाज व फेरीबोटींमुळे जाळ्यांचे नुकसान होते.

इतर अपघात व दुर्घटना घडत असतात तसेच सदर प्रवाशी फेरी बोटींमध्ये क्षमतेपेक्षा जास्त प्रवाशी घेऊन जातात. हे योग्य आहे का? याची चौकशी करणे, तसेच फेरी बोटीची क्षमता पाहता कमीत कमी प्रवाशी घेऊन जाणे बंधनकारक करावे अन्यथा नियम मोडणाऱ्या व पर्यटकांचा जीव धोक्यात घालणाऱ्या प्रवासी बोटींना कठोर दंड आकारावा, अशी मागणी आमदार म्हात्रे यांनी विधानसभा अधिवेशनात केली.

# पनवेलमध्ये ३०४ बेवारस वाहनांवर कारवाई

## बेशिस्त पार्किंगसाठीही ठोठावला दंड

**पनवेल : वार्ताहर**

महापालिका कार्यक्षेत्रात पथपदांवरती उभी असलेली नादुरूस्तीची, भंगार व पडीक दुचाकी, चारचाकी बेवारस वाहनांवरती आयुक्त मंगेश चितळे यांनी दिलेल्या सूचनेनूसार महापालिकेच्या वतीने कारवाई करण्यात येत असून आतापर्यंत ३०४ बेवारस वाहनांवर कारवाई करण्यात आली. यासोबतच पालिका हद्दीत सार्वजनिक रस्त्यांवरील सुमारे ५७ बेवारस वाहनांना दंड आकरण्यात आला आहे. इतर बेशिस्त वाहन पार्किंग करणाऱ्या बेशिस्त वाहनचालकांचे कारवाईच्या भीतीने धाबे दणाणले आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २३० व २३१ नुसार महानगरपालिका आयुक्त यांची लेखी परवानगी घेतल्याशिवाय महानगरपालिका क्षेत्रातील रस्त्यावर वा पदपथापर कोणतीही वस्तू ठेवण्यास मनाई आहे तसेच महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियमांनूसार महानगरपालिका आयुक्त यांना रस्त्यावरील व पदपथावरील ठेवण्यात आलेली वस्तू किंवा वाहन नोटीस न देता काढून टाकण्याचा अधिकार प्राप्त आहे. कामासाठी महापालिकेने ठेकेदाराची नेमणूक केली आहे.

महापालिका हद्दतील चारही प्रभागांमधील सार्वजनिक रस्त्यांवरील बेवारस वाहनांचे सर्वेक्षण करण्यात आले असून या वाहनांवरती सात दिवसांची नोटीस चिकटविण्यात येत आहे. सात दिवसांमध्ये संबधित वाहन मालकाने वाहन न नेल्यास, वाहनांचे टोईंग करून महापालिकेने निश्चित केलेल्या यार्डमध्ये वाहन नेले जाईल. प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या सहकार्याने सदर वाहन मालकाचा शोध घेऊन वाहन मालकास वाहन घेऊन जाण्यासाठी ४५ दिवसांची नोटिस देण्यात येते. या दरम्यान वाहन मालक वाहन घेऊन जाण्यास उपस्थित झाल्यास त्यास महापालिकेने वाहनाच्या प्रकारानुसार निश्चित केलेल्या दंड रकमेचा भरणा केल्यानंतर संबधित वाहन मालकास वाहन सुपूर्त करण्यात येते. ४५ दिवसांत जर वाहन मालकाने वाहन नेले नाही तर पुन्हा एकदा सात दिवसांची नोटीस देण्यात येते.

या नोटीसीची दखल वाहन मालकाने न घेतल्यास सदर वाहनाचे प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत मुल्यांकन करण्यात येईल. त्यानंतर या वाहनांचा लिलाव महापालिकेमार्फत करण्यात येणार आहे, अशी माहिती अतिरिक्त आयुक्त डॉ. प्रशांत रसाळ यांनी दिली.



### नो पार्किंग बोर्डसमोरच पार्किंग

*शहरात येणाऱ्या वाहनांची संख्याही मोठ्या प्रमाणात आहेत. त्यामुळे रस्त्यावर वाहनांची गर्दी सतत वाढती आहे. रस्त्याच्या कडेला बेकायदा पार्किंग होऊ नये व वाहन चालकांना शिस्त लागावी म्हणून वाहतूक पोलिसांनी शहरातील जागा निश्चित करून पार्किंग, नो पार्किंग झोन निश्चित केले. कोणत्या भागास सम-विषम तारेखस वाहनांचे पार्किंग करायचे हे ठरवून शहरात तसे बोर्ड ठिकठिकाणी लावले गेले, मात्र जिथे नो पार्किंगचे बोर्ड आहेत तिथेच वाहने पार्क केली जातात. या झोनची अंमलबजावणी नीट होताना दिसत नाही.*

**पनवेल येथील आदर्श हॉटेल नाका ते गावदेवी मंदिराजवळील मधल्या रस्त्यात रस्त्याच्या दोन्ही बाजूला चारचाकी वाहने बेकायदेशीरपणे उभी असल्याने वाहतुकीस मोठ्या प्रमाणात अडथळा निर्माण होत असून पालिकेने अशा बेशिस्त वाहनचालकांना दंड आकारल्यास वाहतूक कोंडीतून सुटका होईल.**
**-चारुदत्त पाद्धे, वाहनचालक**

**उभ्या असलेल्या वाहनांमुळे वाहतूक कोंडी होत असल्याचे निदर्शनास आले असून अशा बेशिस्त वाहनमालकांवर पालिकेच्या माध्यमातून कारवाई हाती घेण्यात आली असून वाहनचालकांनी बेकायदेशीरपणे वाहन सार्वजनिक रस्त्यावर उभे करू नये.**
**-मंगेश चितळे, आयुक्त, पालिका**

# पोलिसाच्या घरामधून लाखोंच्या ऐवजाची चोरी

**पनवेल : वार्ताहर**

अज्ञात चोरट्यांनी कळंबोलीमधील एलआयजी वसाहतीत राहणाऱ्या पोलिसांचे घर फोडून त्यांच्या घरातून सुमारे १७ लाख रुपये किंमतीचे वेगवेगळ्या प्रकारचे दागिने आणि रोख रक्कम चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. कळंबोली पोलिसांनी या प्रकरणातील अज्ञात चोरट्यांविरुध्द घरफोडीचा गुन्हा दाखल करुन त्यांचा शोध सुरू केली.

या प्रकरणातील तक्रारदार अमोल म्हात्रे (वय ४१) कळंबोली सेक्टर २मधील एलआयजी वसाहतीत कुटुंबासह राहत असून, सध्या त्यांची नियुक्ती नवी मुंबई पोलीस नियंत्रण कक्षात आहे. अमोल म्हात्रे यांच्या भावाच्या मुलीच्या वाढदिवसानिमित्त त्यांचे सर्व कटुंबिय वाढदिवसाच्या कार्यक्रमासाठी पेण, सोनखार येथे गेले होते. तर अमोल म्हात्रे सीबीडीबेलापूर येथील नवी मुंबई पोलीस नियंत्रण कक्षात रात्रपाळीच्या ड्युटीवर गेले होते.

या कालावधीत अमोल म्हात्रे यांचे घर बंद असल्याने चोरट्यांनी संधी साधुन पहाटेच्या सुमारास त्यांच्या घराचा कडी कोयंडा तोडला. त्यानंतर चोरट्यांनी अमोल म्हात्रे यांच्या घरातील सुमारे १७ लाख रुपये किंमतीचे वेगवेगळे सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम चोरुन नेली. सकाळी पावणे सहा वाजण्याच्या सुमारास अमोल म्हात्रे यांच्या घराच्या वरील मजल्यावर राहणाऱ्या भाडेकरुला म्हात्रे यांच्या घराचा कडी कोयंडा तोडल्याचे आणि दरवाजा उघडा असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे त्यांनी अमोल म्हात्रे यांना फोनवरुन याबाबतची माहिती दिली. त्यानंतर म्हात्रे यांनी घरी धाव घेऊन पहाणी केली असता, घरामध्ये चोरी झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यानंतर अमोल म्हात्रे यांनी कळंबोली पोलीस ठाणे मध्ये चोरीबाबत तक्रार दाखल केली.



**पनवेल : रयत शिक्षण संस्थेचे रायगड विभागीय पीआरओ बाळासाहेब कारंडे यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी रायगड विभागाचे श्री. गुजर, श्री. गावंड, अमित भोसले उपस्थित होते.**

# पॅथोलॉजी लॅबमधील महिलेचा विनयभंग

**पनवेल : वार्ताहर**

पॅथोलॉजी लॅबमध्ये रक्त तपासणीसाठी गेलेल्या ५० वर्षीय व्यक्तीने लॅबमधील महिलेसोबत गैरवर्तन करून तिचा विनयभंग केल्याची घटना कामोठेमध्ये घडली. कामोठे पोलिसांनी लॅबमधील महिलेसोबत गैरवर्तन करणाऱ्या व्यक्तीविरोधात विनयभंगाचा गुन्हा दाखल केला आहे.

या प्रकरणातील आरोपी कामोठेत राहण्यास असून तो आपल्या परिसरातील लॅबमध्ये रक्त तपासणी करण्यासाठी गेला होता. या वेळी लॅबमध्ये ३० वर्षीय महिला रक्त संकलनाचे काम करत होती. या वेळी पिडीत महिलेने त्याचे रक्त तपासणीसाठी घेतल्यानंतर त्याच्या हातावरील रक्त कॉटनने पुसले. त्यानंतर कॉटन डस्टबीनमध्ये टाकत असताना, त्या व्यक्तीने तिला पाठीमागून मिठी मारून तिच्यासोबत गैरवर्तन केले.

या प्रकारानंतर पिडीत महिलेने आरडा ओरड केली. त्यानंतर तिने या व्यक्तीविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

# महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील वाणिज्य शाखेतर्फे सोमवारी (दि.१८) दुपारी ३ वाजता करिअर मार्गदर्शनपर सत्राचे आयोजन केले होते.



या करिअर मार्गदर्शनसाठी प्रा. राहुल कांबळे तसेच प्रा. विशाल देशमुख तसेच वाणिज्य शाखेतील इतर सर्व प्राध्यापक यांनी रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयातील अकरावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना करिअर विषयक मार्गदर्शन केले तसेच भविष्यामध्ये वाणिज्य व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळ्या क्षेत्रात असणाऱ्या करिअरच्या संधी याविषयी माहिती विद्यार्थ्यांना दिली.

महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी या शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन केल्याबद्दल वाणिज्य शाखेतील सर्व प्राध्यापक, विद्यार्थी यांचे कौतुक केले व पुढील उपक्रमांसाठी शुभेच्छा दिल्या.

या करिअर मार्गदर्शन सत्राचे आयोजन प्रा. विशाल देशमुख यांनी केली तसेच वाणिज्य शाखेतील इतर सर्व प्राध्यापक विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

# तळोजातील टेक्नोऑ इमॅजिन कंपनीत वेतन आणि बोनस करार

## भाजपप्रणित कामगार संघटनेचा पाठपुरावा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तळोजा येथील टेक्नोऑ इमॅजीन कंपनीमध्ये मंगळवारी (दि.१७) भाजप प्रणित जय भारतीय कामगार संघटनेचे सल्लागार आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली संघटनेचे अध्यक्ष जितेंद्र घरत यांच्या हस्ते वेतन व बोनस करार झाला.

या वेळी संघटनेचे पनवेल सरचिटणीस ॲड. विनायक मुंबईकर, सेक्रेटरी गौरवनाथ बनसोडे, खजिनदार नारायण बंगेरा, सदस्य राजेश गाडे, वसंत साळुंके तसेच व्यवस्थापनातर्फे डायरेक्टर मंगेश कुलकर्णी, सीईओ अमित खुराना, ह्युमन राईटस ऑफिसर रत्नाकर कुलकर्णी, एचआर ॲडमिन अमृता पाटील आदी उपस्थित होते.

निमोशियन पद्धतीने व्यवस्थापनाबरोबर समन्वय साधून १४.५०० रुपयांचा करार झाला व चार वर्षांसाठी बोनस करार झाला. कंपनीमधून मिळणाऱ्या कपड्यामध्ये वाढ करण्यात आली असून व्यवस्थापन व युनियनच्या सहकार्याने चांगल्या पद्धतीने करार झाल्यामुळे कामगारांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.



**अशी आहेत कराराची वैशिष्ट्ये**

१ जुलै २०२४ ते ३० जून २०२८ या चार वर्षांच्या कालावधीसाठी जलद गतीने करार झाला. वेतन कराराची रक्कम १४.५००.०० चार वर्षांसाठी आहे. बोनस करारामध्ये प्रत्येक वर्षी २.५०० ची वाढ देऊन ४८ हजार रुपये देण्यात आले आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे मेडिक्लेम सुविधा १० लाख ८० टक्के व्यवस्थापन बेअर करणार व २० टक्के कामगार बेअर करणार आहे. रजेच्या साठ्यामध्ये ७५ ने वाढ करण्यात आली आहे. यात पीएल २५, सीएल ७, एसएल ७, पीएच ११ असे ठरविण्यात आले.

# सीकेटी विद्यालयाची शैक्षणिक सहल उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापन धोरणानुसार जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालय, इंग्रजी माध्यमाने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सहलीचे आयोजन केले होते. इयत्ता पाचवीची सहल जीजामाता उद्यान, मत्सालय आणि हॅंगींग गार्डन व म्हातारीचा बूट येथे सहल गेली होती.

इयत्ता सहावीची नॅशनल पार्क आणि कनेरी केव्हस्, येथे सहल गेली होती. सातवीची सहल नेहेरू तारांगण, नेहरू सायन्स सेंटर आणि डिस्कवरी ऑफ इंडिया येथे सहल गेली होती. आठवीची सहल मुरूड जंजिरा येथे सहल गेली होती. नववीची सहल राष्ट्रीय सुरक्षा ॲकॅडमी, पुणे येथे दरवर्षी जाते. ती प्रस्तावित आहे लवकरच ती नेण्यात येणार आहे. इयत्ता १० वीच्या विद्यार्थ्यांना यु.के.ज रिसॉर्ट खोपोली येथे नेण्यात आली होती.

क्षेत्र भेटीचा मुख्य उद्देश ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि मनोरंजन या बरोबरच व्यवहारिक शिक्षण वाढविण्यासाठी सर्व वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी क्षेत्रभेटी किंवा सहली आयोजित केल्या जातात.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी आवश्यक अशा क्षेत्रभेटींचे अभ्यासपूर्ण नियोजन केले आहे. गेली काही वर्ष विद्यार्थी अशा क्षेत्रांना भेट देत आहेत. आपल्या सहध्यायीबरोबर प्रवास करून तसेच अशा क्षेत्रांना भेट देऊन अनेक मूल्यांचे शिक्षण विद्यार्थ्यांना मिळते. म्हणूनच पालक वर्गही या उपक्रमामुळे संतुष्ट आहे.





# मोहम्मद रफींना १०० गायकांचे जन्मशताब्दीनिमित्त अभिवादन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महान पार्श्वगायक मोहम्मद रफी यांच्या जन्मशताब्दी वर्षपूर्तीनिमित्त, रफीसाहेबांच्या तीन दशकांच्या सुरेल कारकिर्दीला अभिवादन करण्यासाठी 'द डिव्हाइन म्युझिक अनलिमिटेड' आणि पनवेल कल्चरल सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या रफी गीत गायन स्पर्धेस महाराष्ट्रभरातून अभूतपूर्व प्रतिसाद लाभला असून तब्बल १०० हौशी गायकांनी या स्पर्धेत भाग घेतला आहे.



या स्पर्धेची पहिली फेरी गेल्या रविवारी पनवेलमधील तथास्तू सभागृहात झाली. या फेरीतून २० स्पर्धकांची अंतिम फेरीसाठी निवड करण्यात आली असून ही अंतिम फेरी येत्या रविवारी, २२ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ११ ते दुपारी २ या दरम्यान रोजी पनवेल महापालिकेच्या फडके नाट्यगृहात आयोजित करण्यात आली आहे.

या अंतिम फेरीचे परीक्षण सुप्रसिद्ध गायिका, हिंदी चित्रपट संगीताच्या अभ्यासक आणि लेखिका डॉ. मृदुला दाढे आणि संगीत संयोजक व नोटेशन तज्ज्ञ अरविंद मुखेडकर करणार आहेत. स्पर्धेतील (१६ ते ४० आणि ४० व त्यापुढील अशा) दोन्ही गटातील प्रथम आणि द्वितीय क्रमांकाच्या विजेत्यांना प्रत्येकी ७,००० रुपये व ५,००० रुपयांची पारितोषिके देण्यात येणार आहेत.

स्पर्धेनंतर विविध संगीत कार्यक्रमांतून गेली अनेक वर्षे रफीसाहेबांची गाणी गाणाऱ्या प्रभंजन मराठे, नितीन डिस्कळकर आणि दीपक चव्हाण या रफीसाहेबांची गाणी गेली तीन दशके सादर करणाऱ्या तीन व्यावसायिक गायकांना सन्मानित करण्यात येणार आहे. पनवेल महानगरपालिका आणि रंगनील नाट्यसंस्था हे या उपक्रमाचे 'व्हेन्यू पार्टनर' आहे.

हा कार्यक्रम द डिव्हाइन म्युझिक अनलिमिटेड आणि पनवेल कल्चरल सेंटर यांच्या सभासदांना विनाशुल्क असून सदस्यांनी प्रवेशिकांसाठी अजय भाटवडेकर (९९३०५ ४०७५०) अथवा सतीश गुणे (९८२०४ ९९४९८) यांच्याशी संपर्क साधावा.

# खारघरच्या रामशेठ ठाकूर महाविद्यालयात फूड कार्निवल

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात बुधवारी (दि.१८) सांस्कृतिक विभागातर्फे फूड कार्निवलचे आयोजन केले होते.



महाविद्यालयातील सर्व शाखेतील प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थी व विद्यार्थ्यांनी या दिवशी मोठ्या प्रमाणामध्ये वेगवेगळ्या फुडचे स्टॉल लावले होते. या फूड कार्निवलचा मुख्य उद्देश महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना भारतीय फुड कल्चर विषयी माहिती व्हावी हा होता. या फूड कारणीवलमध्ये महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या फूड आयटमचा आस्वाद घेतला.

महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. महेश्वरी झिरपे यांनी या फूड कार्निवलचे आयोजन केल्याबद्दल आयोजकांचे अभिनंदन केले व पुढील उपक्रमांसाठी शुभेच्छा दिल्या. या कार्निवलची आयोजन प्रा. डॉ. दीपिका हसीजा यांनी केले. नमिता आखूरे व रंजना राणा यांनी परीक्षक म्हणून कामकाज पाहिले तसेच प्रा. डॉ. महादेव चव्हाण, प्रा. नंदिनी सपकाळ, प्रा. शुभम शर्मा, प्रा अमोल वाघे, प्रा. तनुजा सुमन, प्रा. शिवानी मानकामे तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

# विद्यार्थ्यांना ट्रेडिंग टेक्नॉलॉजीचे प्रशिक्षण

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील माहिती व तंत्रज्ञान तसेच संगणक विभागाच्या यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी (दि.१७) विद्यार्थ्यांसाठी ट्रेडिंग टेक्नॉलॉजीचे प्रशिक्षण देण्यात आले.

या प्रशिक्षणासाठी नरेंद्र मोरया व हरीश मोरे यांनी उपस्थित राहून महाविद्यालयातील दोन्ही विभागातील विद्यार्थ्यांना एसटीएमएल, जावा, स्क्रेल अशा वेगवेगळ्या सॉफ्टवेअर विषयी माहिती तसेच हॅंडऑन ट्रेनिंग दिले. या हॅंडऑन ट्रेनिंगचा प्रमुख उद्देश महाविद्यालयातील दोन्ही विभागातील विद्यार्थ्यांना ट्रेडिंग टेक्नॉलॉजी बद्दल माहिती व्हावी तसेच त्यांना चांगल्या पद्धतीने प्रशिक्षण मिळावे हा होता. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी या हॅंडऑन ट्रेनिंगसाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले व शुभेच्छा दिल्या.

या प्रशिक्षणाचे आयोजन प्रा. राजश्री म्हात्रे व प्रा. रिजवाना मोमीन यांनी केले तसेच दोन्ही विभागातील इतर सर्व सदस्य, विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.



## संपादकीय

# दुर्दैवी अपघाताचे बळी

मुंबईजवळच्या घारापुरीकडे निघालेल्या प्रवासी बोटीला नौदलाच्या स्पीड बोटीने धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात बुधवारी १३ जणांचा मृत्यू झाला. नौदलाच्या स्पीड बोटीच्या इंजिनातील बिघाडामुळे हा अपघात झाल्याचे प्राथमिक चौकशीत सांगितले गेले असले तरी नौदलाकडून याची सखोल चौकशी करण्यात येणार आहे. कित्येक वर्षे ज्या मार्गावर बोटीद्वारे पर्यटक व प्रवासी ये-जा करीत आले आहेत, तिथे अशात्‍ऱ्हेने अपघात होणे हे आत्यंतिक दुर्दैवी आहे.

**मुंबईच्या दक्षिणेकडील 'गेट वे ऑफ इंडिया' हे मुंबईत येणाऱ्या तमाम देशीविदेशी पर्यटकांचे हमखास भेट देण्याचे ठिकाण असते. पर्यटकच कशाला, सुटी पडली की मुंबई व आसपासचे रहिवासीही अनेकदा आपल्या चिल्ल्यापिल्ल्यांना घेऊन गेट वे ऑफ इंडिया गाठतात. दक्षिण मुंबईत भटकंती करायची, प्रवासीबोटीने घारापुरी गाठून एलिफंटा लेणी पहायची हा अनेकांचा सुटीतला कार्यक्रम असतो. विशेषत: संध्याकाळी सूर्यास्त होण्याआधी मुंबईनजीकच्या समुद्रातली ही सफर आल्हाददायक अशीच असते. या सफरीचा अनुभव मुंबई व आसपासच्या अनेकांनी आयुष्यात एकदा-दोनदा तरी आवडीने घेतलेला असतो. परंतु नेमकी हीच वेळ बुधवारी त्या दुर्दैवी बोटीतील प्रवाशांसाठी घातवेळ ठरली. 'नीलकमल' ही प्रवासी बोट पर्यटक आणि प्रवाशांना घेऊन घारापुरीकडे जात होती. दुपारी ३.५५ वाजता नौदलाच्या एका 'स्पीडबोटी'ने या प्रवासीबोटीला जोरदार धडक दिली. त्यामुळे 'नीलकमल' बोट कलंडली आणि बुडू लागली. सुदैवाने अपघाताची माहिती मिळताच नौदल, तटरक्षक दल व मुंबई सागरी पोलिसांच्या पथकांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. नौदलाच्या ११ नौका, तटरक्षक दलाची एक व येलोगेट पोलिस ठाण्याच्या ३ नौका तसेच स्थानिक मच्छिमार नौकांच्या साह्याने मदतकार्य सुरू करण्यात आले. नौदलाच्या चार हेलिकॉप्टरचीही मदत घेण्यात आली. प्रवासी आणि कर्मचारी मिळून दोन्ही बोटींवर एकूण ११४ जण होते. यापैकी १३ जणांचा या दुर्घटनेत मृत्यू झाला. चौघांची प्रकृती चिंताजनक असून ९७ जणांची प्रकृती स्थिर असल्याचे मुंबई महापालिकेकडून सांगण्यात आले. पाच जणांचा शोध रात्री उशीरापर्यंत लागू शकला नव्हता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पाच लाखांची तर पंतप्रधान मोदी यांनी दोन लाखांची मदत मृतांच्या वारसांना जाहीर केली आहे. धडकलेल्या स्पीड बोटीने आधी प्रवासीबोटीभोवती तीन फेऱ्या मारल्या होत्या. त्यानंतर ती प्रवासीबोटीवर येऊन धडकल्याचे बचावलेल्या प्रवाशांनी म्हटले आहे. स्पीडबोटीच्या इंजिनाची चाचणी करण्यात येत होती व त्या इंजिनातील बिघाडामुळे नियंत्रण सुटून ती प्रवासीबोटीवर आदळली असे सांगितले गेले असले तरी नौदलाकडून याची सखोल चौकशी होणार आहे. प्रवासीबोटीवरील प्रवाशाने रेकॉर्ड केलेला व्हिडिओही समाजमाध्यमांवरून समोर आला आहे. प्रवासीबोट क्षमतेपेक्षा कितीतरी अधिक प्रवाशांना घेऊन जात असल्याचे आढळल्याने या बोटीच्या मालकाविरोधातही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या बोटीचा वेगही नेहमीपेक्षा अधिक भासल्याचे काही प्रवाशांनी म्हटले आहे. अनेकदा या मार्गावरील बोटी क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी नेत असतात. लाइफ जॅकेटसारख्या सुविधांची कमतरता तर असतेच. प्रवाशांनी प्रवासादरम्यान ते घालणे अपेक्षित असते, पण किती प्रवाशांना याची कल्पना असते वा दिली जाते हा प्रश्न आहेच. लाइफ जॅकेट कसे वापरावे, अपघात झाल्यावर काय करावे याची कल्पना प्रवाशांना कधीही दिली जात नाही. या अशा दुरावस्थेबद्दल कोणी कुणाला दोष द्यायचा? एखाद्या दुर्दैवी घटनेतून ही परिस्थिती चव्हाट्यावर येते इतकेच.**

# रेवस-करंजा जलमार्गावर दोन प्रकल्प



**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**

अलिबाग आणि करंजा या दोन तालुक्यांच्या दरम्यान धरमतर खाडी आहे. या खाडीवर रेवस-करंजा पूल बांधण्यात येणार आहे. त्यास मंजूरी देखील मिळाली आहे. असे असले तरी याच मार्गावर सागरी रो-रो प्रकल्पदेखील उभारण्यात येत आहे. रेवस-करंजा पूल बांधून झाल्यानंतर त्यावरून वाहतुक सुरू होईल. या पुलावरून वाहतूक सुरू झाल्यानंतर रेवस-करंजा या जलमार्गावरील रो-रो सेवा कशासाठी सुरू ठेवणार. जर रेवस-करंजा पूल होणारच असेल तर याच मार्गावर रो-रो सेवा कशासाठी? एकाचवेळी एकाच मार्गावर दोन प्रकल्प कशासाठी हा प्रश्न उपस्थित केला जात आहे. तो रास्त आहे. केंद्र सरकारच्या सागरमाला योजनेंतर्गत रेवस व करंजा या ठिकाणी जेट्टी उभारणीपासून रस्ता, टर्मिनल, पार्किंग सेवा अशा अनेक सुविधा निर्माण केल्या जात आहेत. महाराष्ट्र मेरिटाईम बोर्ड या दोन्ही जेट्टीचे काम करत आहे.

रेवस-करंजा खाडीवर पूल उभारण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळाच्या माध्यमातून अलिबाग तालुक्यातील रेवस ते उरण तालुक्यातील करंजा दरम्यानच्या दोन किलोमीटर लांबीच्या पुलाचे काम हाती घेण्यात आले आहे. यासाठी दोन हजार ९६३ कोटी रुपयांचा ठेका 'ॲफकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चर' कंपनीला देण्यात आला असून कंपनी पुढील तीन वर्षात हे काम पूर्ण करणार आहे. दरम्यान, खाडी पूल उभारण्यास झालेल्या विलंबामुळे ४४ वर्षात खाडी पुलाचा खर्च दोन हजार ६६३ कोटींनी वाढला आहे.

अलिबाग आणि उरण या दोन तालुक्यांना जोडणाऱ्या खाडीपुलाची चर्चा १९७०पासूनच सुरू झाली होती. त्यानंतर १९८०मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री बॅ. ए. आर. अंतुले यांनी या प्रकल्पासाठी ३०० कोटी रुपयांची तरतूदही केली होती. काही कामेही सुरू झाली होती, परंतु बॅ. अंतुले मुख्यमंत्री पदावरून पायउतार झाल्यानंतर १९८२मध्ये लगेचच हा प्रकल्प गुंडाळण्यात आला. त्यानंतर स्व. मधुकर ठाकूर यांनी या पुलासाठी प्रयत्न केले. आमदार प्रशांत ठाकूर यांनीदेखील या पुलासाठी प्रयत्न केले. अलिबागचे आमदार महेंद्र दळवी यांनी रेवस-करंजा पूल व्हावा यासाठी प्रयत्न केले. या पुलाच्या कामाची निविदादेखील काढण्यात आली आहे. त्यामुळे या पूलाचे काम सुरू होईल असे वाटत आहे.

हा प्रकल्प पूर्ण झाल्यास रेवस रेड्डी सागरी महामार्ग दृष्टिक्षेपात येणार आहे. रेवस ते करंजा हा पूल दोन किमी लांबीचा असून चार लेन पूल उभारण्यात येणार आहे. या पुलामुळे जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट ते अलिबाग दरम्यानचे अंतर २५ किलोमीटरवरून कमी होणार आहे. या पुलावरून तब्बल ८० किलोमीटर प्रतितास वेगाने वाहने धावतील असे डिझाईन विकसित करण्यात येत आहे. पुलावर दोन्ही बाजूला १.५ मीटर रुंद पादचारी पदपथ समाविष्ट करण्यात आले आहेत. पुलाला जोडण्यासाठी करंजा येथे ५.१३ किलोमीटर लांबीचा, तर रेवस येथे १.७१ किलोमीटर लांबीचा रस्ता बांधण्यात येणार आहे. या पुलामुळे अलिबागहून रस्त्याने उरणाला जाण्यासाठी जो वळासा घालावा लागतो तो कमी होणार आहे. रेवस-करंजा पूल सुरू झाल्यास वाशी ते रेवस हे अंतर ३९ कि.मी. कमी होईल. वाशी ते मांडवा हे अंतर ३९ कि. मी., उरण-अलिबाग अंतर ४४ कि.मी.ने, जेएनपीटी-अलिबाग अंतर ३५ कि. मी. ने तर जेएनपीटी-मुरूड अंतर ३६ कि. मी.ने कमी होईल. त्याचबरोबर अटल सेतूशी जोडले आणार असल्यामुळे थेट मुंबईला जाणे शक्य होणार आहे. त्यामुळे हा पूल होण गरजेचे आहेच.

रेवस-करंजा पूल होणार आहे. असे असले तरी रेवस करंजादरम्यान रो-रो जलवाहतूक सेवा सुरू करण्यात येणार आहे. यासाठी करंजा व रेवस येथे रो-रो २०१८पासून कामे हाती घेण्यात आली आहेत. करंजा बंदरावरील जेट्टीचे काम पूर्ण होऊन पाच वर्षे झाली आहेत. त्या जेट्टीची दुरवस्था होऊ लागली आहे. करंजा बंदरावरील जेट्टीचे काम पूर्ण होऊन पाच वर्षे झाली आहेत, मात्र या जलमार्गावरील रेवस जेट्टीचे काम अनेक कारणांनी रखडले आहे.

रेवस जेट्टी येथील कामाचा खर्च २५ कोटींवरून ३० कोटींवर पोहोचलला आहे. हे काम पूर्ण करण्यासाठी नव्याने निविदा मागविण्या आल्या आहेत. त्यामुळे या जेट्टीचे काम पूर्ण होण्यासाठी आणखी काही महिने लागण्याची शक्यता आहे.


रेवस-करंजा पूल ही काळाची गरज आहे. हा पूल व्हावा ही अलिबागकरांची गेल कित्येक वर्षांची मागणी आहे. या पूलाचे काम सूर होणार आहे. काम पूर्ण झाल्यानंतर रेवस ते करंजादरम्यान अंतर वाहनाने दहा मिनिटांच्या आत पार करणे सहज शक्य होणार आहे. असे असताना रो-रो प्रकल्पदेखील बांधला जात आहे. रो-रो प्रवास करण्यसाठी जहाजात वाहने पार्क करणे, त्यांनतर जलमार्गे प्रवास पूर्ण केल्यानंतर जहाजातून वाहन बाहेर काढणे यात वेळ जाणार आहे.

अशा परिस्थितीत रो-रो सेवा वापर प्रवासी करतला का? असा प्रश्न पडणारच. जर या रो-रो सेवेला प्रतिसाद मिळाला नाही तर ही सेवा बंदच करावी लागणार आहे. या रो-रो प्रकल्पासाठी सुमारे ४५ कोटींचा खर्च होणर आहे. खर्च पाण्यात जाण्याची शक्यता आहे.




## स्मार्टफोनमध्ये स्टोरेज कमी पडतंय? मग 'हे' करा

जेव्हा तुम्हाला ईमेल पाठवण्यात, गूगल फोटोजमध्ये एखादा फोटो निवडण्यास अडथळा निर्माण होतो. मग तेव्हा आपण नको असलेले फोटो, व्हिडीओ, फाईल्स डिलीट करण्यास सुरुवात करतो. स्मार्टफोनमध्ये सतत स्टोरेजची समस्या येतेय? बहुतेक स्मार्टफोन आता १२८ जीबी स्टोरेजसह येतात. पण, स्मार्टफोनमधील हे स्टोरेज महत्त्वाचे फोटो, व्हिडीओ, फाईल्सने लगेच भरून जातात. पण, आपण सहसा या गोष्टीकडे दुर्लक्ष करतो. जेव्हा स्टोरेज भरलेले असते, तेव्हा तुम्हाला ईमेल पाठवण्यात, गूगल फोटोजमध्ये एखादा फोटो निवडण्यास अडथळा निर्माण होतो. मग तेव्हा आपण नको असलेले फोटो, व्हिडीओ, फाईल्स डिलीट करण्यास सुरुवात करतो



पण, फोनमधील स्टोरेजची समस्या सोडवण्यासाठी आम्ही एक खास युक्ती घेऊन आलो आहोत. अण्ड्रॉइड स्मार्टफोनमध्ये अनेक नको असलेले ॲप्सदेखील जास्त स्टोरेज फूल होण्यास कारणीभूत असतात. अनेक इन्स्टॉल केलेले ॲप्स फोनमधील महत्वाची जागा व्यापून घेतात. यातील असे अनेक ॲप्स असतात जे आपण इन्स्टाल करतो, पण त्याचा वापर करतच नाही.


तर अण्ड्रॉइड युजर्ससाठी, गुगलने एक फीचर सादर केले आहे, जे न वापरलेले ॲप्स आपल्या फोनवरून अर्काइव्ह करतात आणि स्मार्टफोनमधील जागा मोकळी करतात. न वापरलेले ॲप्सचे चिन्ह, युजर डेटा आणि बेसिक फंक्शनलिटी इन्टॅक्टसह युजर्स रिमूव्ह करू शकतात. जेव्हा डिव्हाइसचे स्टोरेज कमी असेल तेव्हा तुम्ही ते पुन्हा ऑटो-अर्काइव्ह करू शकता.

तर या फीचरचा वापर कसा करायचा चला पाहू मोबाइलमधील प्ले स्टोअरमध्ये जा. प्रोफाइल आयकॉनवर क्लिक करा.

त्यानंतर सेटिंग पर्यायावर क्लिक करा.सगळ्यात वर असणाऱ्या जनरलवर क्लिक करा.

खाली स्क्रोल करा आणि ॲटोमॅटीकली अर्काइव्ह ॲप ऑन करा.एकदा तुम्ही हे फीचर एनेबल केले की, तुमच्या फोनवरील न वापरलेले ॲप्स अर्काइव्ह केले जातील. कोणतीही महत्त्वाची फाईल डिलीट न करता तुम्ही तुमच्या फोनचे स्टोरेज अगदी सोप्या पद्धतीने खाली करू शकता.

# राष्ट्र संत गाडगेबाबा



**निमित्त**

राष्ट्र संत गाडगेबाबा महाराष्ट्र राज्यातील एक कीर्तनकार, संत आणि समाजसुधारक होते. त्यांनी स्वेच्छेने गरीब रहाणी स्वीकारली होती. त्यांना सामाजिक न्याय, सुधारणा आणि स्वच्छता या विषयांत जास्त रुची होती. विसाव्या शतकातील समाजसुधार आंदोलनांमध्ये ज्या महापुरुषांचा सहभाग आहे, त्यापैकी एक महत्त्वाचे नाव गाडगेबाबा यांचे आहे. आज त्यांची पुण्यतिथी आहे

संत गाडगे महाराजांचा जन्म शेंडगाव ता-दर्यापूर जि-अमरावती येथे २३ फेब्रुवारी १८७६ रोजी झाला त्यांचे पूर्ण नाव डेबूजी झिंगराजी जानोरकर होते. मूर्तिजापूर तालुक्यातील दापुरे येथे मामाकडेच त्यांचे बालपण गेले. लहानपणापासूनच त्यांना शेतीत रस होता, विशेषतः गुरांची निगराणी राखायला त्यांना फार आवडे. त्यांचे वडील झिंगराजी हे परीट होते. आई सखूबाईने त्यांचे नाव डेबूजी असे ठेवले होते.

गाडगे महाराज हे वैज्ञानिक दृष्टिकोन असलेले समाजसुधारक होते. दीनदलित आणि पीडितांच्या सेवेमध्ये आपले संपूर्ण आयुष्य व्यतीत करणारे होते. त्यांच कीर्तन म्हणजे लोक प्रबोधनाचा एक भाग असे. आपल्या कीर्तनातून समाजातील दांभिकपणा रूढी परंपरा यावर ते टीका करत. समाजाला शिक्षणाचे महत्त्व पटवून देताना स्वच्छता आणि चारित्र्य याची शिकवण गाडगेबाबा देत.

गोरगरीब, दीनदलित यांच्यामधील अज्ञान, अंधश्रद्धा, अस्वच्छता यांचे उच्चाटन करण्यासाठी कार्य करणारे समाजसुधारक होते. तीर्थी धोंडापाणी देव रोकडा सज्जनी। असे सांगत दीन, दुबळे, अनाथ, अपंगांची सेवा करणारे थोर संत म्हणजे गाडगेबाबा. देवळात जाऊ नका, मूर्तिपूजा करू नका, सावकाराचे कर्ज काढू नका, अडाणी राहू नका, पोथी-पुराणे, मंत्र-तंत्र, देवदेवस्की, चमत्कार असल्या गोष्टींवर विश्वास ठेवू नका. अशी शिकवण आयुष्यभर त्यांनी लोकांना दिली. माणसात देव शोधणाऱ्या या संताने लोकांनी दिलेल्या देणग्यांतील पैशांतून रंजल्या-गांजल्या, अनाथ लोकांसाठी महाराष्ट्रात ठिकठिकाणी धर्मशाळा, अनाथालये, आश्रम, व विद्यालये सुरू केली. रंजले-गांजले, दीन-दुबळे, अपंग-अनाथ हेच त्यांचे देव. डोक्यावर झिंज्या, त्यावर खापराच्या तुकड्याची टोपी, एका कानात कवडी, तर दुसऱ्या कानात फुटक्या बांगडीची काच, एका हातात झाडू, दुसऱ्या हातात मडके असा त्यांचा वेश असे.

समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, भोळ्या समजुती, अनिष्ट रूढी-परंपरा दूर करण्यासाठी त्यांनी आपले पूर्ण आयुष्य वेचले. यासाठी त्यांनी कीर्तनाच्या मार्गाचा अवलंब केला. आपल्या कीर्तनात ते श्रोत्यांनाच विविध प्रश्न विचारून त्यांच्या अज्ञानाची, दुर्गुण व दोषांची जाणीव करून देत असत. त्यांचे उपदेशही साधे, सोपे असत. चोरी करू नका, सावकाराकडून कर्ज काढू नका, व्यसनांच्या आहारी जाऊ नका, देवा-धर्माच्या नावाखाली प्राण्यांची हत्या करू नका, जातिभेद व अस्पृश्यता पाळू नका असे ते आपल्या कीर्तनातून सांगत. देव दगडात नसून तो माणसांत आहे हे त्यांनी सर्वसामान्यांच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न केला. संत तुकाराम महाराजांना आपले गुरू मानीत. 'मी कोणाचा गुरू नाही, मला कोणी शिष्य नाही' असे ते कायम म्हणत. आपले विचार साध्या भोळ्या लोकांना समजण्यासाठी ते ग्रामीण भाषेचा उपयोग करत असत. 'देवभोळ्या माणसापासून ते नास्तिकापर्यंत, कोणत्याही वयोगटातील लोकांना गाडगेबाबा आपल्या कीर्तनात सहजपणे गुंतवून ठेवत, आपले तत्त्वज्ञान पटवून देत. त्यांच्या कीर्तनाचे शब्दचित्र उभे करणे माझ्या ताकदीबाहेरचे काम आहे.' असे उद्गार बाबांचे चरित्रकार प्रबोधनकार ठाकरे यांनी काढले होते. त्यांचा स्मृत्यू २० डिसेंबर १९५६ वलगावजवळ अमरावती येथे झाला

**क्लिक...क्लिक...!**




**नवी मुंबई : वाशी येथे भरलेल्या महालक्ष्मी सरस प्रदर्शनात स्टॉलवरील स्फटीक माळा पहाताना ग्राहक.** (छाया : नितीन देशमुख )

## आरोग्य प्रहर

### आले-लिंबाच्या पाण्याचा यकृतावर कसा परिणाम?



लिव्हर क्लीन्स आणि डिटॉक्स ड्रिंक्समध्ये आरोग्याला चालना देणारे घटक असू शकतात; परंतु तुमच्या आरोग्यामध्ये लक्षणीय फरक आणण्यासाठी त्यामध्ये पुरेसे आवश्यक घटक नसू शकतात तुमच्या नित्यकर्मात यकृताची सफाई करणारे हे पेय समाविष्ट केल्याने त्याच्या कार्यांना समर्थन मिळू शकते आणि संपूर्ण आरोग्य चांगले राखण्यास मदत होते.

यकृत शरीरातील सर्वांत महत्त्वाच्या अवयवांपैकी एक आहे, जो डिटॉक्सिफिकेशन, प्रथिने संश्लेषण व पचन यांसह ५०० पेक्षा जास्त आवश्यक कार्ये करतो. आधुनिक जीवनशैली, खराब आहाराच्या निवडी, प्रदूषण व तणाव यांमुळे यकृताला अनेकदा विषाक्त आणि हानिकारक पदार्थसेवनाचा फटका बसतो. तुमच्या नित्यकर्मात यकृताची सफाई करणारे हे पेय समाविष्ट केल्याने त्याच्या कार्यांना समर्थन मिळू शकते आणि संपूर्ण आरोग्य चांगले राखण्यास मदत होते.

निरोगी प्रौढांमध्ये यकृत विषाक्त पदार्थांना निरुपद्रवी बनविण्यास आणि ते आपल्या शरीरातून काढून टाकण्यास सक्षम असते. लिव्हर क्लीन्स आणि डिटॉक्स ड्रिंक्समध्ये आरोग्याला चालना देणारे घटक असू शकतात; परंतु तुमच्या आरोग्यामध्ये लक्षणीय फरक आणण्यासाठी त्यामध्ये पुरेसे आवश्यक घटक नसू शकतात. पण, ही पेये निरोगी जीवनशैलीला पूरक ठरू शकतात आणि आपल्या यकृताला पोषक घटकांसह आधार देऊ शकतात.

**यकृताच्या आरोग्यासाठी डिटॉक्स पेय**

निरोगी लोकांमध्ये यकृत शरीरातील विषाक्त घटक शरीराबाहेर काढण्याचे कार्य खूप चांगल्या पद्धतीने करते. पण, जर आपण खराब अन्नपदार्थ खाल्ले, जास्त मद्यपान केले किंवा काही औषधे घेतली, तर यकृताला योग्यरीत्या काम करणे कठीण होऊ शकते. यकृताची सफाई करणारे पेय आणि डिटॉक्स ड्रिंक्समध्ये आरोग्याला चालना देणारे घटक असू शकतात; परंतु तुमच्या आरोग्यामध्ये लक्षणीय फरक घटक घडवून आणण्यासाठी पण, ही पेये निरोगी जीवनशैलीला पूरक ठरू शकतात आणि आपल्या यकृताला पोषक घटकांसह आधार देऊ शकतात.

लिंबू-आले पाणी : लिंबू व्हिटॅमिन सी आणि अँटीऑक्सिडंट्सने समृद्ध आहे, जे यकृताला डिटॉक्सिफिकेशनसाठी आवश्यक एन्झाइम तयार करण्यास मदत करू शकते. दुसरीकडे आल्यामध्ये दाहकविरोधी गुणधर्म असतात आणि ते पचनास प्रोत्साहन देते. त्यामुळे यकृताला फॅट्सवर प्रक्रिया करण्यास आणि विषाक्त पदार्थ बाहेर काढण्यास मदत मिळते.

# पर्यटकांच्या सुरक्षा व्यवस्थेबाबत उपाययोजना कराव्यात

## गड-किल्ले, समुद्रकिनारी, धबधबे इत्यादी ठिकाणी दक्षतेचे आवाहन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

नववर्षाच्या स्वागताच्या निमित्ताने तसेच नाताळ सणाच्या सुट्टीमुळे कोकणामध्ये विशेषतः रायगड जिल्ह्यामध्ये प्रसिध्द गड किल्ले, धबधबे, तलाव, नदी समुद्राकिनाऱ्यावर पर्यटकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असते. यापूर्वी समुद्रामध्ये बुडून, धबधबे, तलावाच्या ठिकाणी पर्यटकांचा मृत्यू झाल्याच्या घटना घडलेल्या आहेत. त्यामुळे पर्यटकांची संभाव्य जीवित हानी होऊ नये, यासाठी पर्यटकांच्या सुरक्षेसाठी संबंधित विभागांनी आपल्या स्तरावरुन पुढीलप्रमाणे उपाययोजना कराव्यात अशा सूचना रायगडचे निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, संदेश शिर्के यांनी दिल्या आहेत.

नगरपालिका/ग्रामपंचायतीमार्फत सर्व बीचेसवर, गड किल्ले, धबधब या ठिकाणी बोर्ड/फ्लेक्स बोर्ड/बॅनरव्दारे सुचनाफलक लावावेत. गड/किल्ले, धबधबे, समुद्र किनाऱ्यावर बिचवर पोलीस विभागाने पुरेसा पोलीस बंदोबस्त ठेवावा. मुख्य अधिकारी यांनी नगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये तसेच तहसिलदार/गटविकास अधिकारी यांनी ग्रामीण भागात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून पर्यटनस्थळी सुरक्षेच्या दृष्टीने रुग्णवाहिका, बचाव साहित्य, रबरी बोट, लाईफ जॅकेट, जीवरक्षक, सुरक्षा गार्ड, गाईड इ. सुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यात. वन व्यवस्थापन समितीमार्फत गड किल्ल्यावर जाणाऱ्या मार्गावर सुचनां फलक लावावेत. स्थानिक प्रशिक्षित गाईड उपलब्ध करावेत.

उपविभागीय अधिकारी तहसिल कार्यालयाकडील लाईफ जॅकेटस् व लाईफ बोयाज, टॉर्च, रोप इ. साहित्य आपत्कालीन प्रसंगी स्वयंसेवकांना उपलब्ध करुन देण्यात याव्यात. नागरी संरक्षण दल व गृहरक्षक



दलाकडील स्वयंसेवकांना जीवरक्षक म्हणून ठेवण्यात यावे. नगरपालिका/ग्रामपंचायती यांनी सुरक्षा जॅकेट, बोटी, पोहणाऱ्या व्यक्ती इ. संसाधने उपलब्ध ठेवावीत. इंडियन कोस्ट गार्ड विभागाने आवश्यक बोटी, लाईफ जॅकेट, डायव्हर्स इ. उपलब्ध करुन देण्यात यावेत, घटना घडल्यास समुद्र किनारी तात्काळ शोध व बचाव मोहिम हाती घ्यावी. नगरपालिका/ग्रामपंचायती यांनी पर्यटनस्थळी घनकचरा व्यवस्थापनासाठी आवश्यक कार्यवाहीकरावी. स्वच्छत्ता पथक स्थापित करावेत. पर्यटनस्थळी पार्किंगची पुरेशी व्यवस्था करावी.

नगरपालिका/ग्रामपंचायतीने ध्वनीक्षेपकाव्दारे बीचवर पर्यटकांना स्वतःची काळजी घेणे, खोल समुद्रात न जाणे इ. सुचनां पर्यटकांना देण्यात याव्यात. बीचवरील अनधिकृत वॉटरस्पोर्टस, ए.टी.व्ही. वाहने, पॅरासेलिंग, विविध वॉटर राईडस् चालविणाऱ्या विरुध्द कारवाई करावी, नद्यांवर रिव्हर राफ्टींग, वॉटरस्पोर्टस उपक्रम चालविणाऱ्या संस्थांकडे पुरेसे तज्ञ मनुष्यबळ व सुरक्षेचे साहित्य उपलब्ध आहे अगर कसे याची तपासणी करावी.

अनधिकृत उपक्रम चालविणाऱ्या संस्था/व्यक्ती यांच्यावर नियमोचित कारवाई करावी. पर्यटनस्थळावर मनोरंजनासाठी चालविण्यात येणाऱ्या विविध खेळ, उपक्रमांसाठी संबंधित संस्था/व्यक्ती यांनी शासनाकडून परवाना घेतला आहे अगर कसे? तसेच त्यांच्याकडे कुशल मनुष्यबळ व सुरक्षा साहित्य उपलब्ध आहे अगर कसे? याची सर्व संबंधित विभागप्रमुखांनी त्यांच्यास्तरावरुन तपासणी करावी. सर्व विभागांचे नियंत्रण कक्ष २४७ कार्यरत राहतील, याची दक्षता घ्यावी. कोणत्याही अपघाताप्रसंगी आपल्या विभागाकडून तात्काळ सक्षम प्रतिसाद मिळेल, अशी व्यवस्था करावी. कोणत्याही अपघाताची माहिती तत्काळ जिल्हाधिकारी, अपर जिल्हाधिकारी व नियंत्रण कक्षास सादर करावी.

आवश्यक सुरक्षेच्या उपाययोजनां स्थानिक स्वराज्य संस्थांनी कराव्यात, उपविभागीय अधिकारी व तहसिलदार यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील पर्यटनस्थळांवरील पर्यटकांच्या सुरक्षेच्या उपाययोजनांचा आढावा घेवून शोध व बचाव पथके साहित्यांसह तत्पर ठेवावेत, सुरक्षेच्या उपाययोजनां अभावी घटना घडल्यास संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

## मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर भाताण बोगद्याजवळ अपघात

**खालापुर : प्रतिनिधी**

मुबंई पुणे द्रुतगती महामार्गावर बुधवारी (दि. १८) पहाटे कंटेनरने समोरुन जाणाऱ्या आयसर टेम्पोला जोरदार धडक दिल्याने भीषण अपघात झाला. यामध्ये कंटेनर चालक गंभीर जखमी झाला

मुबंई पुणे एक्सप्रेसवेवरून आयसर टेम्पो क्रमांक ( एम.एच. १२ एस.एक्स २२३२) चालक सिद्धेश्वर हनुमंत माळी ४० रा पुणे हा आपल्या ताब्यातील टेम्पो पुण्याहून मुबंई कडे माल घेऊन जात असताना तो भातान बोगद्याजवळ कसळखंड गावाच्या हद्दीत आला असता पाठीमागून येणाऱ्या कंटेनर क्रमांक (चक४६ इऋ४९०४ ) याचे वरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने त्याने समोरील आयसर टेम्पोला जोरदार धडक दिल्याने अपघात झाला.

अपघातात कंटेनर चालक रवींद्र पटेल रा नाव्हसेवा याच्या पायाला गंभीर जखमी झाली जखमीला एम जी एम रुग्णालय कळंबोली येथे दाखल करण्यात आले आहे यात दोन्ही वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. अपघात ग्रस्त दोन ही वाहने एक्सप्रेसवेच्या बाजूला घेऊन रस्ता वाहतूकिसाठी पुर्ववत करण्यात आला.



## ई-रिक्षासंदर्भात माथेरानकर मुख्याधिकाऱ्यांच्या भेटीला

**माथेरान : बातमीदार**

माथेरान शहरात प्रायोगिक तत्त्वावर सुरू असलेला ई-रिक्षा प्रकल्पा संदर्भात माथेरानकर एकवटले असून सर्वांनी एकत्रित येत माथेरान गिरीस्थान नगरपालिका मुख्याधिकारी तथा प्रशासक राहुल इंगळे याची भेट घेऊन ई-रिक्षांची संख्या वाढविणे तसेच ई-रिक्षा सेवा आता २४ तास सुरू ठेवणे या महत्वपूर्ण विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

माथेरान पर्यटनस्थळी महत्वपूर्ण आणि पर्यावरण पूरक प्रायोगिक तत्त्वावर एकवर्षासाठी ई-रिक्षा प्रकल्प सुरू आहे.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सुरू असलेला ई-रिक्षा प्रकल्प माथेरान पर्यटनस्थळासाठी फारच



लाभदायक आणि फायदेशीर ठरला आहे.ई-रिक्षा सेवेमुळे येथील विद्यार्थी वर्ग,जेष्ठ नागरिक तसेच दिव्यांग बांधव आणि या सुप्रसिद्ध पर्यटनस्थळी येणारे पर्यटक समाधान व्यक्त करीत आहेत.येथील पर्यटनात सुद्धा या वर्षभरात मोठी वाढ झालेली याठिकाणी येथे दिसत आहे.

हा महत्वपूर्ण प्रकल्प कायमस्वरूपी सुरू रहावा तसेच ई-रिक्षा संख्येत वाढ होऊन एकूण सर्वच ९४ रिक्षा सुरू कराव्यात यासाठी माथेरान नागरिकांनी नगरपालिका मुख्याधिकारी तथाप्रशासक राहुल इंगळे यांची भेट घेतली तसेच ई-रिक्षा सेवा आता २४ तास सुरू ठेवावी या संदर्भातदेखील चर्चा करण्यात आली.

## श्रीवर्धनमध्ये मोकाट घोड्यांचा कायमस्वरूपी बंदोबस्त करण्याची मागणी

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन शहरात गेल्या काही वर्षांपासून मोकाट घोड्यांचा त्रास नागरिकांना होत होता. समुद्रकिनाऱ्यावर सुरू असलेल्या घोडा गाडी व उंटाची सवारी बंद केल्यामुळे शेतकरी आणि बागायतदारांना आता नवीन समस्यांचा सामना करावा लागत आहे.आता श्रीवर्धन शहरात मोकाट सोडलेल्या घोड्यांचा नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर व शेती व्यवसायावर गंभीर परिणाम होत आहे.त्यांचा बंदोबस्त करणे आवश्यक आहे




काही दिवसांपूर्वी घोडा गाडी व्यवसायिकांमध्ये वाद निर्माण झाला, ज्यामुळे हाणामारी देखील झाली. यामुळे प्रशासनाने समुद्रकिनारी घोडा गाडी व उंटाची सवारी बंद करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयाचे स्वागत श्रीवर्धनमधील नागरिकांकडून होत आहे.श्रीवर्धनमधील पर्यटन व्यवसाय मुख्यतः शनिवार व रविवार दोन दिवस होतो, तर उर्वरित पाच दिवस व्यवसाय मंद असतो. त्यामुळे दोन दिवसाच्या व्यवसायानंतर घोडे मोकाट सोडले जातात, आणि त्यामुळे शहरातील बाजारपेठेत अनेक वेळा अपघात झाले आहेत. तसेच शेतकरी व नारळ सुपारी बागांमध्ये देखील घोड्यांनी मोठे नुकसान केले आहे.

प्रशासन घोड्यांना मोकाट सोडण्यावर नियंत्रण ठेवण्यात अपयशी ठरले होते, पण घोडा गाडी व्यवसायिकांमध्ये झालेल्या वादामुळे हा व्यवसाय बंद करण्यात आला. त्यामुळे शहरात मोकाट सोडलेल्या घोड्यांचाा नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर व शेती व्यवसायावर गंभीर परिणाम होत आहे. त्यामुळे प्रशासनाने मोकाट घोड्यांचा कायमस्वरूपी बंदोबस्त करण्यासाठी योग्य उपाययोजना कराव्यात, जेणेकरून शहरातील जनजीवन सुरळीत आणि सुरक्षित होईल, अशी शहरातील नागरिकांची मागणी आहे.

## काळजी व संरक्षणासाठी दाखल केलेल्या मुलांच्या नातेवाईकांना आवाहन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

बालकांना काळजी व संरक्षणासाठी बाल कल्याण समिती, रायगड यांच्या आदेशाने एस.ओ.एस चिल्ड्रन व्हिलेज इंडिया सोगाव ता.अलिबाग, जि. रायगड येथे काळजी व संरक्षणासाठी दाखल करण्यात आले आले असून त्या मुलांची नावे पुढीलप्रमाणे आहेत.

शांती सचिन वाघमारे (वय ०९ वर्षे १०), निवेश संतोष करकरे (वय १२ वर्षे) या दोन बालकांचे पालक व नातेवाईकांनी हे वृत्त प्रसिद्ध झाल्यापासून तीस दिवसांच्या आत आत नामे संस्था एस.ओ.एस चिल्ड्रन व्हिलेज इंडिया सोगाव ता.अलिबाग रायगड फोन नंबर ९४२२५३२२५२ या नंबर वरती संपर्क साधावा, अन्यथा बालकांची जबाबदारी घेण्यास कोणीही नाही, असे समजून मा. बाल कल्याण समिती, रायगड यांच्या मार्फत बालकांचे कायमस्वरूपी पुनर्वसन करण्यात येईल,असे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी कळविले आहे.

एसओएस चिल्ड्रन व्हिलेज इंडिया सोगाव ता. अलिबाग रायगड संपर्क क्रमांक ९४२२५३२२५२ बाल कल्याण समिती, रायगड, जिल्हा महिला व बालविकास विभाग, अलिबाग-रायगड संपर्क क्रमांक ७७७५०१८१९७ येथे संपर्क साधावा.


**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E –TENDER NOTICE (THIRD & FOURTH CALL)**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification.**

| Sr. No. | Tender/Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1. | **Tender No:-** EE/EHV (O &M ) /DIVN/MHD/Tech/E-Tender-18/IVth Call/2024-25 Dtd.19.12.2024 **RFx No.7000031499** | **Sub.:-Fourth Call** for SRM E-Tender for various regular preventative maintenance / emergency and breakdown works of various 220KV & 100KV Substations under EHV O&M Dn. Mahad for the year 2024-25. | Rs. up to 7,00,000/- (Including GST+ 1% Labour CESS) |
| 2. | **Tender No:-** EE/EHV (O &M)/DIVN/MHD/Tech/Third Call/E-Tender-37/2024-25 Dtd.19.12.2024 **RFx No. –7000033219** | **Sub:-Third Call** for SRM E-Tender for the work of repairing/overhauling of Air Compressors of 220kV/100kV CB at various Substations under EHV (O&M) Dn. Mahad for the year 2024-25. | Rs.2,17,808/- (including GST + 1% Labour CESS) |

EMD will be the 1% of the estimated cost or Rs.5000/- whichever is the highest & tender fee will be the 500/-+GST.

Bid submission is from 19.12.2024 @ 00:00 hrs to 28.12.2024 @23:59Hrs for above tender For further details visit our website:-**https://srmetender.mahatransco.in**

**Contact Person:-** The Addl.Executive Engineer, (O): Phone No.7373101089

Note: All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

**-Sd/-**
**Executive Engineer (I/c) EHV(O&M) Dn. Mahad**



**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे अजिवली, तहसील-पनवेल, जिल्हा रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार संगिता उर्फ गुणा बाळकृष्ण बडे, श्री. समीर बाळकृष्ण बडे, राहणारः अजिवली, ता. पनवेल, जिल्हा रायगड, यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**शेतजमीनीचे वर्णन**

मौजे अजिवली, तहसील पनवेल जिल्हा रायगड येथील जिल्हा परीषद रायगड, पंचायत समिती पनवेल, मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील.

| गट क्रमांक व उपविभाग | भोगवटादार वर्ग | क्षेत्र: लावणी लायक हे.आर.प्रती | क्षेत्र: पोटखराबा हे.आर.प्रती | क्षेत्र: एकुण क्षेत्र एकुण क्षेत्र | आकार रू.पै |
|---|---|---|---|---|---|
| १९/२ | १ | ०-४४-०० | ०-००-०० | ०-४४-०० यापैकी ०-२२-०० | ४.५८ |

वरील शेतजमीन/मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन ७ दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोष्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १९/१२/२०२४

सही/-
ॲड. उज्वला धोंडू तेटगुरे
बी.ए, एल.एल.बी.
(खरेदीदाराचे वकिल)

कार्यालयीन पत्ता :- बी. १०२, पहिला मजला, श्री दत्तराज सोसायटी, जुने तहसिलदार ऑफिस समोर ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६ मोबाईल नं. ७०२११५०४६१



**पनवेल महानगरपालिका, पनवेल**

**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**

**जाहीर नोटीस सूचना**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८(३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | बांधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण व ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, पनवेल महानगरपालिका. | ०२ शेवगा, ०१ उंबर, ०२ जंगली व ०१ सुकलेले मृत अशी एकुण ०६ झाडे तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील भु.क्र.१२ अ, सेक्टर-१२, खारघर या ठिकाणी दैनिक मच्छी मार्केट उभारणे या कामामध्ये ०६ झाडे बाधित होत आहेत. |
| २ | कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, पनवेल महानगरपालिका. | ०८ करंज, ०१ नारळ, ०६ जंगली, ०३ [illegible] पाम, ०१ बदाम, ०१ जांभुळ, ०१ सुकलेले मृत अशी एकुण २१ झाडे तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती अ. प्रभाग क्र. ०१ कोयनावेळे व घोट या गावांना जोडणाऱ्या रस्त्यावरील तळोजा नदीवरील पुलाचे बांधकाम करणे या कामामध्ये २१ झाडे बाधित होत आहेत. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यास येईल, याची नोंद घ्यावी.

जा.क्र. पमपा/उद्यान/२१२४/प्र.क्र. ८४/८३७/२०२४
दिनांक : १९/१२/२०२४

सही/
(स्वरूप खारगे)
सहा. आयुक्त (वृक्ष प्राधिकरण)
पनवेल महानगरपालिका



**ग्रुप ग्रामपंचायत वावर्ले, ता. खालापूर, जि. रायगड**

**निविदा सुचना**

ग्रुप ग्रामपंचायत वावर्ले करिता ग्रामनिधी / १५ वा वित्त आयोग /जनसुविधा/ जि. प. सेस/ दलित वस्ती सुधारणा / पं. स. सेसमधून निधी मधून खालील कामे करणे करिता नोंदणीकृत जि.एस.टी ठेकेदार, धारकाकडून लिफाफा पद्धतीने मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहे. तरी इच्छुक ठेकेदारांनी आपल्या सिलबंद निविदा दि. २०/१२/२०२४ ते २७/१२/२०२४ रोजी कार्यालयीन वेळेत ग्रामपंचायत कार्यालयात स्वीकारण्यात येतील.

| अ.क्र. | कामाचे नाव / वस्तूचे नाव | अंदाजपत्रक रक्कम | १ टक्का इसारा रक्कम | निविदा सादर करणेची: अंतिम तारीख | निविदा सादर करणेची: वेळ | निविदा सादर करणेची: ठिकाण | काम पूर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सौर दिवे बसविणे | १४५०००/- | १४५०/- | २७/१२/२०२४ | ०५.०० | ग्रा.पं.का. वावर्ले | ६ महिने |
| २ | मौजे वदविहीर २ सभामंडप शेड टाकणे वाढीव काम | १४०३००/- | १४०३/- | २७/१२/२०२४ | ०५.०० | ग्रा.पं.का. वावर्ले | ६ महिने |
| ३ | मौजे वावर्ले स्टॉप, पाली बु. स्टॉप व वावर्ले रा.जि.प. शाळेजवळ हायमास्ट बसविणे, | २९९९६७/- | ३०००/- | २७/१२/२०२४ | ०५.०० | ग्रा.पं.का. वावर्ले | ६ महिने |
| ४ | चिंचखांबला कातकरवाडी ते वडविहीर कातकरवाडी पाईपलाईन टाकणे | २५३६४१/- | २५३६/- | २७/१२/२०२४ | ०५.०० | ग्रा.पं.का. वावर्ले | ६ महिने |
| ५ | सार्वजनिक ठिकाणी कचराकुंड्या खरेदी करणे. | २५००००/- | - | २७/१२/२०२४ | ०५.०० | ग्रा.पं.का. वावर्ले | ६ महिने |

१. प्राप्त निविदा दि. ३०/१२/ २०२४ रोजी ठिक १२.०० वाजता ग्रा. पं. का. वावर्ले येथे उपस्थितांच्या समक्ष मा. सरपंच यांच्या हस्ते उघडण्यात येईल,
२. निविदा भरणारे ठेकेदार हे नोंदणीकृत जी.एस.टी धारक असावेत,
३. कोणते हि एक अथया अनेक निविदा कोणतेही कारण न देता नाकारणेचा अधिकार प्रशासक वावर्ले यांनी राखून ठेवला आहे.
४. प्रत्येक देयकाकडूत शासन नियमाप्रमाणे रकमा कपात केल्या जातील, मा. उपअभियंता साहेब बांधकाम उपविभाग कर्जत यांचे कडील तांत्रिक अधिकारी व पं. स. खालापूर बांधकाम अभियंता तसेच ग्रा. पं. चे पदाधिकारी सदस्य यांचे मार्गदर्शन व देखरेखीखाली सदर काम करणेने असून काम समाधान कारक नसले तर त्याच स्थितीत बांबून कार्यारंभ आदेश रद्द करणेचा अधिकार ग्रा. पं. ने राखून ठेवला आहे.
५. काम अंतिम रित्या पूर्ण झाल्यानंतर ६ महिन्यानंतर कामाची स्थिती पाहून कपात केलेली सुरक्षा अनामत परत केली जाईल.
६. ग्रामपंचायतीकडे रकम उपलब्ध झालेनंतर ठेकेदाराला रकम अदा केली जाईल.
७. ग्रामपंचायत नोटीस बोर्ड व गावातील प्रमुख ठिकाणी प्रसिद्धी.
८. निविदा भरणारे साहित्य पुरवठा धारक हे नोंदणीकृत जी.एस.टी धारक असावेत.

सही/-
ग्रामविकास अधिकारी
ग्रुप ग्रामपंचायत वावर्ले
ता. खालापूर, जि. रायगड

सही/-
सरपंच
ग्रुप ग्रामपंचायत वावर्ले
ता. खालापूर, जि. रायगड

## निवडक

### करंजाडेमध्ये आढळला मृतदेह

**पनवेल :** करंजाडे सेक्टर ३ येथील साईटवर एका इसमाचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत. मयत व्यक्तीचे अंदाजे वय ४० वर्षे, डोक्याचे केस काळे पांढरे, दाढी मिशी वाढलेली, बांधा सडपातळ, उंची पाच फुट असून, अंगात पिवळा टी शर्ट व काळी पॅन्ट घातलेली आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे (०२२-२७४५२३३३) किंवा सहा.पो.नि.सारिका झांझुर्णे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### दत्त जन्मोत्सव उत्साहात

**पनवेल :** देवद येथील आध्यात्मिक व सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या श्री शिवगिरी सेवा संस्थानचे वतीने प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी श्री दत्त जन्मोत्सव शनिवार उत्साहात साजरा करण्यात आला. पनवेलच्या माजी उपमहापौर चारुशीला घरत यांच्या हस्ते श्री दत्त मंदिर ए-टाईप येथे जमलेल्या भाविकांना संस्थेच्या वतीने छापण्यात आलेल्या साधना पुस्तिका आणि जपयंत्रांचे मोफत वाटप करण्यात आले. ओरियन मॉल (पनवेल) चे मालक मंगेश परुळेकर यांच्या भेटीने कार्यकर्त्यांच्या उत्साहात भर पडली. मंडळाच्या ज्येष्ठ साधिका माधुरी मिठबावकर यांच्या विवाहाला साठ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल त्यांचाही यथोचित सत्कार या ठिकाणी करण्यात आला.

# पनवेल परिसरात वृद्धाश्रमाच्या संख्येत वाढ

**पनवेल : वार्ताहर**

जसजसे जग आधुनिकीकरणाकडे प्रगती करत आहे, तसतसे वृद्धांना दुर्लक्षित केले जाते आणि स्वतःचे रक्षण करण्यासाठी एकटे सोडले जात असून अनेक संकटांवर मात करून स्वतःच्या मुलांना त्यांच्या पायावर उभे करून तसेच काटकसर करून मुलांना लहानाचे मोठे केले जाते, परंतु तिच मूल मोठे झाल्यावर आई वडिल हे मुलांना ओझं वाटत असून त्यांना पनवेल परिसरातील वृद्धाश्रमात टाकत असल्याने तालुक्यात मोठ्या संख्येने वृद्धाश्रमात वाढ होत आहे.



वृद्धाश्रमांची संख्या वाढण्याचे पहिले आणि प्रमुख कारण म्हणजे लोकांची बदलती जीवनशैली. पूर्वी, कुटुंबे संयुक्त कुटुंबात राहत असत, जेथे वडील आणि त्यांची मुले आणि नातवंडे यांचा आदर केला जात असे. तथापि, विभक्त कुटुंबांच्या सुरुवातीसह, वृद्धांना स्वतःचे रक्षण करण्यासाठी अनेकदा एकटे सोडले जाते. नोकरीच्या चांगल्या संधींसाठी मुले दूर जातात आणि वृद्ध लोक मागे राहतात, त्यांना एकटेपणा आणि दुर्लक्षित वाटते. याशिवाय, अनेक तरुण नोकरी आणि त्यांचे पालक एकटे पडल्यामुळे परदेशात स्थलांतरित होतात. यामुळे वृद्धांना साहचर्य आणि काळजी मिळू शकेल अशा वृद्धाश्रमात वाढ झाली आहे. बर्याच वृद्ध प्रौढांना राहण्याची उच्च किंमत परवडत नाही आणि त्यांना स्वतंत्रपणे जगणे कठीण होते. वृद्धाश्रम त्यांना एक परवडणारा पर्याय प्रदान करतात जिथे ते आरामात जगू शकतात आणि त्यांना आवश्यक असलेली काळजी घेऊ शकतात. याव्यतिरिक्त, महिलांची संख्या वाढत असल्याने, त्यांना त्यांच्या पालकांची आणि आजी-आजोबांची घरी काळजी घेण्यासाठी मदतीची आवश्यकता आहे.

वृद्धाश्रमाच्या मागणीत वाढ झाली आहे, जेथे वृद्धांना त्यांच्या मुलांच्या अनुपस्थितीतदेखील काळजी आणि लक्ष मिळू शकते. कौटुंबिक संरचना बदलत आहे. विभक्त कुटुंबांच्या वाढीमुळे आणि मुलांचे काम किंवा शिक्षणासाठी स्थलांतर झाल्यामुळे, पारंपारिक संयुक्त कुटुंब व्यवस्था मोडकळीस येत आहे, वृद्ध लोक एकाकी पडत आहेत.

विभक्त कुटुंब पद्धती हीच वृध्दाश्रमासाठी विषवल्ली ठरली आहे असे म्हटले तरी चालेल तसेच पैसा हा परमेश्वर झाला आहे. नवरा बायको दोघेही नोकरी करतात. खेडेगाव सोडून ही मंडळी शहरांमध्ये येतात. पुन्हा गावाकडे जाण्याचे विसरतात. भौतिक सुविधा, सुखांची लज्जत त्यांना आई वडीलांचा लळा विसरायला लावतो. फार भयानक परिस्थिती निर्माण झाली आहे.

भारत सरकारने ज्येष्ठ नागरिकांना मदत करण्यासाठी टोल फ्री हेल्पलाईन क्रमांक १४५६७ जारी केला आहे. या हेल्पलाईन क्रमांकाद्वारे ज्येष्ठ नागरिकांना पेन्शन आणि इतर कायदेशीर बाबींची माहिती मिळू शकते. या व्यतिरिक्त हा क्रमांक निराधार वृद्धांना भावनिक आधार प्रदान करण्यात आणि अत्याचाराच्या घटना रोखण्यात आणि संरक्षण करण्यासाठी देखील मदत करतो. या सेवेला 'एल्डर लाइन' असे नाव देण्यात आले असून, ही सेवा सकाळी आठ ते रात्री आठ या वेळेत दिली जाते.

**वृद्धजन मुलांना नकोसे**

आधुनिक काळात आईवडील दोघेही नोकरी करीत असल्याने मुलांना पाळणाघरात ठेवतात. हीच मुले वेळेअभावी आईवडीलांना पुढे वृद्धाश्रमात ठेवतील. मूळ मुद्दा असा आहे की, पैसे कमावणे जास्त महत्त्वाचे आहे. धडधाकड वृद्धजनही मुलांना नकोसे झाल्याने आश्रमाचा आश्रय घेतात.

# महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षांचे वेळापत्रक उपलब्ध

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

राज्याच्या प्रशासकीय सेवेतील गट अ आणि गट ब संवर्गातील विविध रिक्त पदे भरती प्रक्रियेसाठी सन २०२५मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत नियोजित स्पर्धा परीक्षांचे अंदाजित वेळापत्रक आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहे, अशी माहिती महाराष्ट्र लोकसेवा आयोग मुंबईचे अवर सचिव र.प्र.ओतारींनी दिली आहे.

शासनाच्या मागणीनुसार शासन सेवेतील विविध पदांवरील भरतीकरिता आयोगामार्फत वर्षभर विविध परीक्षांचे आयोजन करण्यात येते. त्यानुसार सन २०२५ मध्ये घेण्यात येणाऱ्या विविध परीक्षांचे दिनांक निश्चित करण्यात आले आहे. हे वेळापत्रक आयोगाच्या https://mpsc.gov.in आणि https://mpsconline.gov.in या संकेतस्थळांवर प्रसिध्द करण्यात आले आहेत. प्रसिध्द करण्यात आलेले हे वेळापत्रक अंदाजित वेळापत्रक असून, जाहिरातीच्या अथवा परीक्षेच्या प्रस्तावित महिना/दिनांकमध्ये कोणत्याही प्रकारचा बदल होवू शकतो. बदल झाल्यास तो आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. संबंधीत परीक्षेचे परीक्षायोजना, अभ्यासक्रम, निवड पद्धत इत्यादी तपशील आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे आणि तो वेळोवेळी अद्यावत करण्यात येईल. संबधित परिक्षेमधून भरावयाच्या पदसंख्येबाबतचा सविस्तर तपशील जाहिरात/अधिसुचनेद्वारे उपलब्ध करून देण्यात येईल.

वेळापत्रकातील सन २०२५मधील दिनांक निश्चित नसलेल्या परिक्षांचे दिनांक संबधित परिक्षेच्या जाहिरात/अधिसूचनेद्वारे स्वतंत्रपण जाहीर करण्यात येतील. आयोगाकडून आयोजित परिक्षेच्या दिनांकास अन्य संस्थेची परिक्षा असल्यास उमेदवारास कोणती परीक्षा द्यावयाची आहे. याबाबतचा निर्णय उमेदवाराने घेणे आवश्यक आहे, असे ही पत्रकाद्वारे कळविले आहे.

# अनधिकृत बांधकामांवर महापालिकेचा हातोडा

## पनवेलमध्ये अनेक ठिकाणी जेसीबीच्या सहाय्याने तोडक कारवाई

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रात अंतिम भूखंड क्र ३०१ तक्का येथे अनधिकृत बांधकामांवर बुधवारी तोडक कारवाई करण्यात आली. याठिकाणी तीन हजार ७२६ स्वे फूट क्षेत्रामध्ये अनधिकृतपणे एक गोडाऊन, एक मजली इमारत, एक बैठे घर, आणि पाच रूम बांधण्यात आल्या होत्या. या अनधिकृत बांधकामांवरती जेसीबीच्या साह्याने आयुक्त मंगेश चितळे यांच्या निर्देशानूसार तोडक कारवाई करण्यात आली.



या वेळी उपायुक्त रविकिरीण घोडके, सहाय्यक संचालक केशव शिंदे, नगररचनाकार अंकिता नेरकर,सहाय्यक आयुक्त डॉ. रूपाली माने, सहाय्यक आयुक्त श्रीराम पवार,सहाय्यक आयुक्त सुबोध ठाणेकर, प्रभारी अधिक्षक रोशन माळी, प्रभारी अधिक्षक अरविंद पाटील, मुख्य आरेखन नितीन हुद्दार , अतिक्रमण विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.


आयुक्त मंगेश चितळे यांनी दिलेल्या सूचनेनूसार चारही प्रभागांमध्ये फुटपाथवरील अतिक्रमण, रस्त्यावरील अतिक्रमण, अनधिकृत शेड, अनधिकृत झोपड्या व इतर अतिक्रमणविरोधात कारवाई करण्यात येत आहे. त्याप्रमाणे मंगळवारी रात्री प्रभाग समिती ड पनवेल अंतर्गत नवीन पनवेल खाऊ गल्ली येथे फुटपाथवरील सामान जप्त करून कारवाई करण्यात आली व रस्ता मोकळा करण्यात आला.

तसेच बुधवारी पनवेल महानगपालिका उपयुक्त रविकिरण घोडके यांचे आदेशाने प्रभाग समिती अ उप विभाग नावडे हद्दीतील खारघर सेक्टर ३० मधील सिडको भूखंडावरील ३५, अनधिकृत ताडपत्री शेडवर तोडक कारवाई करण्यात आली. ही कारवाई प्रभारी अधीक्षक अमर पाटील, अतिक्रमण पथक खारघर विभाग व नावडे विभाग याचे मार्फत पूर्ण कारण्यात आली. याबरोबरच नावडे विभाग खारघर, सेक्टर ३४ येथील बुधवार आठवडे बाजार बंद करण्यात आला.

# डॉ. होमी भाभा वैज्ञानिक परीक्षेत वरद म्हात्रे अव्वल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

बृहन्मुंबई विज्ञान अध्यापक मंडळ आयोजित डॉक्टर होमी भाभा बाल वैज्ञानिक स्पर्धा दरवर्षी आयोजित केली जाते. महाराष्ट्रामध्ये वैज्ञानिक स्पर्धांमध्ये ही एक नावाजलेली स्पर्धा आहे. इयत्ता सहावी व इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांना या स्पर्धेत सहभाग नोंदवता येतो. यावर्षीच्या झालेल्या या स्पर्धेमध्ये आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके विद्यालयाच्या इयत्ता सहावीच्या तीन विद्यार्थ्यांनी सुयश प्राप्त केले.



विद्यालयातील इयत्ता सहावी चाणक्यमधील विद्यार्थी वरद म्हात्रे हा डॉ. होमी भाभा बाल वैज्ञानिक स्पर्धेत अव्वल गुणांनी उत्तीर्ण झाला तसेच कुमारी समीक्षा फोलाने आणि चि.वेदांत कांबळे हे विद्यार्थीसुद्धा अव्वल गुणांनी उत्तीर्ण झाले आहेत. सदर विद्यार्थ्यांपैकी चि. वरद म्हात्रे आणि समीक्षा फोलाने यांची दुसऱ्या फेरीसाठी निवड झाली आहे. एकूण उत्तीर्ण विद्यार्थ्यांपैकी केवळ अव्वल गुण प्राप्त ७.५ टक्के विद्यार्थी हे प्रात्यक्षिक परीक्षेसाठी पात्र ठरतात. या प्रात्यक्षिक परीक्षा ही संपूर्ण महाराष्ट्रात विभागाच्या केंद्रात होते. ही स्पर्धा शालेय जीवनातील एक महत्त्वाची वैज्ञानिक स्पर्धा असल्याने त्याची काठिण्यपातळी लक्षात घेता या विद्यार्थ्यांनी मिळवलेले यश हे नक्कीच कौतुकास पात्र असे आहे.

विद्यालयाचे योग्य मार्गदर्शन, मेहनत, पालकांचा विश्वास आणि साथ यामुळे सदर यश प्राप्त झालेले दिसत आहे. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी आणि विद्यालयाकडून सदर विद्यार्थ्यांचे तोंड भरून कौतुक करण्यात आले तसेच पुढच्या तयारीसाठी आणि स्पर्धेसाठी त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

# एनएमएमटी बससेवेचा विस्तार करण्याची प्रवाशांची मागणी

**उरण : रामप्रहर वृत्त**

मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रात येणाऱ्या नवी मुंबई नजीकच्या उरण, पनवेल आणि खोपोली या तिन्ही औद्योगिक व वाढत्या नागरिक परिसरातील प्रवाशांना सार्वजनिक वाहतूक व्यवस्था म्हणून एनएमएमटी बससेवा सुरू करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

सिडकोच्या माध्यमातून विकसित होणारे उरण आणि पनवेल हे दोन्ही तालुके मुळात नवी मुंबईच्या विस्तार आणि विकासाचाच एक भाग आहेत. यातील पनवेल विभागात काही प्रमाणात एनएमएमटी बससेवेच्या बससेस काही मार्गावर धावत आहेत, मात्र सध्या पनवेलमधील मुंबई-गोवा व मुंबई-पुणे या दोन्ही राष्ट्रीय महामार्गाच्या मध्यावर व मुंबईला जोडणाऱ्या अटल सेतूलगतच्या पळस्पे, नांदगाव विभागात मोठ मोठे नागरी प्रकल्प उभे राहू लागले आहेत. या हजारो घरांच्या वस्तीकडे जाण्यासाठी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था उपलब्ध नाही.



भविष्यात याच विभागात अनेक घरांचे प्रकल्प येऊ घातले आहेत. त्यामुळे येथील नागरी वस्तीला दळणवळणाची सुविधा आवश्यक आहे, तर दुसरीकडे उरण, पनवेल तालुक्याच्या मध्यावर सद्या नवी मुंबई विमानतळबाधितांना जमिनीच्या मोबदल्यात देण्यात आलेल्या २२.५ टक्के भूखंडावरील पुष्पक नगराची निर्मिती सुरू आहे. या नव्याने निर्माण होणाऱ्या वस्तीला ही एनएमएमटीची बस सेवा सुरू झाल्यास प्रवासी संख्येने वाढ होऊ शकते. या मार्गावर पनवेल-करंजाडे ते पुष्पक नगर या मार्गावर सेवा सुरू केल्यास नवी मुंबई विमानतळ परिसरातील प्रवाशांनाही याचा लाभ घेता येईल.

एनएमएमटीने नेरूळ अटल सेतूमार्गे मुंबई अशी बससेवा सुरू केली आहे. याचा फायदा नवी मुंबई आणि उलवे नोडमधील मुंबईत नोकरी-व्यवसाय करणाऱ्या प्रवाशांना झाला आहे. या बसने प्रवास करण्यास प्राधान्य दिले जात आहे. अटल सेतुमुळे उरण ते मुंबई या मार्गातील अंतर कमी झाले आहे. त्यामुळे उरणच्या प्रवाशांसाठी उरण ते मंत्रालय अटल सेतूमार्गे एनएमएमटी बससेवा सुरू करण्याची मागणी वर्षभरापासून केली जात आहे.

**उरण-पनवेल मार्गही ठरू शकतो फायदेशीर**

उरणपपनवेल हा मार्ग एसटी वाहतुकीचा सर्वात जास्त प्रवासी असलेला मार्ग आहे. या मार्गावरील एसटीच्या दर पंधरा मिनिटांनी असलेल्या बसेसची संख्या कमी झाली आहे. त्यामुळे या मार्गावरील प्रवास करणाऱ्या हजारो प्रवाशांची गैरसोय होत आहे. पनवेल आणि उरण या दोन्ही स्थानकात प्रवाशांना तासन्तास वाट पहावी लागत आहे. त्यामुळे या मार्गावर एनएमएमटीने बससेवा सुरू करण्याची मागणी गेल्या अनेक वर्षांपासून केली जात आहे. हा मार्गही प्रवासी वाहतुकीसाठी फायद्याचा ठरू शकतो.

# अमृत पाटील-नेरूळकर यांना आदर्श शिक्षक पुरस्कार

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

आगरी युथ फोरमचा या वर्षीचा माजी आमदार हरिश्चंद्र पाटील स्मृती पहिला राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार सुप्रसिद्ध गीतकार, पार्श्वगायक, सिने संगीतकार, साहित्यिक तथा नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्र. १५ शिरवणे शाळेचे कला शिक्षक अमृत पाटील-नेरुळकर यांना नुकताच अखिल भारतीय मराठी महामंडळाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाद जोशी यांच्या हस्ते डोंबिवली येथे प्रदान करण्यात आला.



या वेळी व्यासपीठावर ९१व्या अ. भा. साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. लक्ष्मीकांत देशमुख, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, ज्येष्ठ पत्रकार राजेंद्र हुंजे, आगरी युथ फोरमचे अध्यक्ष गुलाब वझे, उपाध्यक्ष विश्वनाथ रसाळ, भजनरत्न शरदबुवा पाटील, कार्याध्यक्ष जालिंदर पाटील, मुख्यसचिव रामकृष्ण पाटील, सचिव प्रकाश भंडारी कोषाध्यक्ष पांडुरंग म्हात्रे आदी मान्यवर उपस्थित होते.

अमृत पाटील-नेरुळकर यांचे सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान असून या बद्दल त्यांना यापूर्वी राष्ट्रीय सामाजिक न्याय पुरस्कार, नवी मुंबई भूषण, स्मार्ट टीचर, यशवंतराव चव्हाण सन्मान, कला गौरव, समाज गौरव, आदर्श शिक्षक, भजन गौरव, पत्रकारिता गौरव आदी ४५ पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

नुकत्याच प्रदर्शित झालेल्या अविरत या मराठी चित्रपटात गायक, गीतकार, संगीतकार अशा तिहेरी भूमिकाही त्यांनी बजाविल्या आहेत. अमृत पाटील यांनी १५ परदेश दौरे केलेले असून सिंगापूर येथे साहित्य संवाद यात्रा, मॉरिशस येथे मराठी नाटक, श्रीलंका येथे हिंदी गीत रामायण असे कार्यक्रम केले आहेत.

# रद्दी विक्रीसाठी इच्छूक पात्र खरेदीदारांनी निविदा सादर करण्याचे आवाहन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

पनवेल प्रादेशिक परिवहन कार्यालयातील जुने कालबाह्य झालेले अभिलेखे निर्लेखित करण्याच्या दृष्टीने रद्दी म्हणून विक्रीस काढण्यात येत आहे. यासाठी संबंधित पात्र रद्दी खरेदीदार, वेस्ट पेपर्स सप्लायर खरेदीदारांनी १८ ते ३० डिसेंबर २०२४ (शनिवार, रविवार व सुट्टीचे दिवस वगळता) या कालावधीमध्ये निविदा सादर कराव्यात असे, आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी पनवेल रमेश चव्हाण यांनी केले आहे.

निविदेच्या अटी व शर्तीमध्ये शॉप ॲक्ट लायसन्स (अधिकृत व नोंदणीकृत खरेदीदार असल्याचे प्रमाणपत्र), टॅन नंबर व जीएसटी भरल्याबाबत रिटर्न/पॅन कार्ड, निविदाधारक हा सरकारमान्य प्रमाणपत्र धारक, अधिकृत रद्दीचा विक्रेता पाहिजे, पेपर मिलचे प्रमाणपत्र (व्यवसाय प्रमाणपत्र), अनामत रक्कम १०,००० रुपयांचा राष्ट्रीय बँकेचा डीडी (प्रादेशिक परिवहन अधिकारी, पनवेल यांचे नावे), दरपत्रक सादर करताना ते प्रति किलोमध्ये सादर करावेत, बंधपत्र १०० रुपये (ज्याचे टेंडर मंजूर करण्यात येईल त्याचे आवश्यक नियमाबाबतचे बंधपत्र लागेल.), पेपरमील मालक/व्यवस्थापक हे रद्दी विकत घेत असतील तर पेपरमील त्यांच्या मालकीची आहे. याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. तसेच पेपरमील मालक/व्यवस्थापक यांना आपण रद्दी पुरवठा करताना याबाबतचा संबंधीत पेपरमीलचा दाखला आणणे आवश्यक आहे. प्राप्त झालेल्या निविदा मान्य करण्याचे वा रद्द करण्याचे सर्व अधिकार प्रादेशिक परिवहन अधिकारी, पनवेल यांनी राखून ठेवले आहेत.

मागविण्यात आलेल्या निविदा या आधीच्या अटी व शर्तीची पूर्तता करीत नसल्यामुळे रद्द समजण्यात याव्यात. ३० डिसेंबर २०२४ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यत कार्यालयास प्राप्त झालेल्या निविदांचा विचार करण्यात येईल. त्यानंतर उशिराने प्राप्त होणाऱ्या निविदांचा कोणताही विचार केला जाणर नाही. या निविदा ३१ डिसेंबर २०२४ रोजी दुपारी ३ वाजता पनेवल प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, पनवेल केंद्रीय सुविधा भवन, दुसरा मजला, लोखंड व पोलाद बाजार, कळंबोली, ता.पनवेल यांच्या कक्षात उपस्थित निविदाधारकांच्या समक्ष उघडण्यात येतील.

# उरण, द्रोणागिरी, न्हावा शेवा, शेमटीखार रेल्वेस्थानकात उद्वाहन सुरू करण्याची मागणी

**उरण : रामप्रहर वृत्त**

रेल्वे स्थानकात चढ-उतार करण्यासाठी उद्वाहनाची व्यवस्था करण्यात आली आहे, मात्र उद्वाहन सुरु नसल्याने ज्येष्ठ नागरिक आणि महिलांचे हाल सुरू आहेत. उरण ते नेरूळ/ बेलापूर या लोकल मार्गावरील लिफ्ट सुरू होण्याची प्रवाशांना गेल्या अकरा महिन्यांपासून प्रतीक्षा आहे.

१२ जानेवारीला उरण ते नेरूळ/बेलापूरदरम्यानची लोकल सुरू झाली आहे, मात्र गेल्या अकरा महिन्यांपासून उरण परिसरातील उरण, द्रोणागिरी, न्हावा शेवा व शेमटीखार या चारही स्थानकातील उद्वाहने आतापर्यंत सुरू झालेली नाहीत. यातील उरण आणि द्रोणागिरी या दोन्ही स्थानकात भुयारी मार्गाने ये-जा करता येते, मात्र न्हावा शेवा व शेमटीखार या स्थानकांच्या फलाटांवर जाण्यासाठी ६५ पायऱ्या चढाव्या व उतराव्या लागत आहेत. त्यामुळे या स्थानकांतून प्रवास करणाऱ्या ज्येष्ठ नागरिक, महिलांना याचा त्रास सहन करावा लागत आहे.



गेल्या वर्षभरापासून येथील प्रवाशांना उद्वाहन सुरू होण्याची प्रतीक्षा आहे. मी ज्येष्ठ नागरिक असून नवी मुंबईत जाण्यासाठी येथील स्थानकातून प्रवास करीत आहे, मात्र या स्थानकातील लिफ्ट गेल्या सुरूच झालेली नसल्याची माहिती नंदकुमार पाटील यांनी दिली आहे. या संदर्भात मध्य रेल्वेच्या जनसंपर्क अधिकारी पी.डी. पाटील यांच्याशी संपर्क केला असता माहिती घेऊन सांगतो असे सांगितले.

# मुरुड बाजारपेठेत दुकानाला आग

## लाखोंचे नुकसान





**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड शहरातील मुख्य बाजारपेठमधील उमेश गोबरे यांच्या मालकीची एक मजली इमारतीमधील खालच्या गाळयातील विजय जैन यांच्या कपड्यांच्या दुकानाला सुरुवातीला आग लागली ही आग एवढी मोठी होती त्या आगीने दुसऱ्या गाळा नाकोडो ज्वेलर्स-अशोक जैन यांचा व वरच्या मजल्यावर वास्तव करणारे मालक- उमेश गोबरे यांच्या वरच्या मजल्यावर आग लागुन पुर्णतः ही एक मजली इमारत जमीन दोस्त झाली यामध्ये लाखो रुपयांचे नुकसान झाले, असा अंदाज वर्तविण्यात आला आहे.

यामध्ये कोणतीही जीवितहानी झाली नाही, मात्र सहकार्य करणारे नागरिक सानी जैन यांच्या डोक्यावर इमारतीचे कौल्ले पडुन जखमी झाले. त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

ही बातमी मिळताच मुरुड तहसीलदार रोहन शिंदे, पोलिस उप अधिक्षक – विनित चौधरी, मुरूड जंजिरा नगर परिषद, मुरूड पोलीस ठाण्याचे, तहसीलदार कार्यालयाचे कर्मचारी अधिकारी येऊन पाहणी करण्यात आली, परंतु अद्यावत यंत्रणा नसल्याने आगीवर नियंत्रण मिळवता आले नाही.

सविस्तर असे आहे की रोजच्या प्रमाणे अशोक जैन देवळातून घरी परताना बाजुला असणाऱ्या विजय जैन यांच्या कपड्यांच्या दुकाना मधुन धुर येत आहे हे दिसताच अशोक जैन यांनी विजय जैन यांना कळविण्यात आले. त्वरीत विजय जैन येऊन आपलं दुकान उघडताच इंन्वटर जवळ आग पेटत आहे जैन यांनी स्वतः आग विझविण्याचा प्रयत्न केला, परंतु कपड्यांला आग लागल्याने ही आग भडकत गेली त्वरित मुरूड जंजिरा नगर परिषद अग्निशमन दलाच्या जवानांना कळविण्यात आले. ताबडतोब घटनास्थळी अग्निशमन गाडी घटनास्थळी येऊन आग विझविण्याचा प्रयत्न हिंदू व मुस्लीम बांधव एकत्र येऊन करत होते, परंतु आग भडगत गेली. ही आग विझविण्यासाठी शहरातील व पंचक्रोशी भागातील शेकडो नागरिकांनी आजुबाजुच्या असणाऱ्या विहीरीतुन नळातुन पाणी टाकून आग विझविण्याचा प्रयत्न करत होत. तर काही जवानांनी व नागरिकांनी घराला बाहेरून सिडी लावुन घरातील सिलेंडर बाहेर काढण्यात आले.

ही आग विझविण्यासाठी अग्निशमनाचे सहा बंब, सहा ट्रक, पाच हजार लिटरच्या १० ड्रम पाणी लागली तरी आग आटोक्यात येत नसल्याने अखेर रोहा येथील अनिकेत तटकरे मित्रमंडळाचे तज्ज्ञ सागर दहिमबेकरआणि सहकारी अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले, त्यांनी उरलेली आग वीजवली आणि मौल्यवान वस्तू व साहित्य काढून दिले. मुरूड कोस्ट गार्ड ट्रकर ही मागविण्यात आले. ही आग आटोक्यात आणण्यात प्रयत्न केला. शेवटी आग सहा तासांनी आटोक्यात आणण्यात यश अग्निशमन दलाला जवानाला आले.

ही आग कशी लागली यांचा तपास मुरुड पोलीस करित आहेत. मुरूड बाजारपेठेतील रस्ते अधीच अरूंद त्यात मुरुड जंजिरा नगरपरिषदेकडे अग्निशमन दलाची एकच गाडी असल्याने ही आग आटोक्यात आणण्यात अपयश येत होते. नगर परिषदेने आजुन एक अग्निशमन दलाची गाडी मागुन नागरिकांचे जीवनाचे सौरक्षण करावे, अशी प्रतिक्रिया नागरिकांकडुन मिळत आहे.

### अद्ययावत अग्निशमन दल हवे!

**मोठ्या क्षमतेची वाहने व प्रशिक्षित आगीत काम कारामारी टीम, पाण्याचासाठा व लाईट गेल्यावर डिझेलवर चालणाऱ्या मोटार व लांब पाईप हे मुरूडला असल्याला हवे याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.**

# माथेरानमध्ये क्ले-पेव्हर ब्लॉक लावण्यास सुरुवात



**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरान शहरात मलनिस्सारण प्रकल्प (एसटीपी प्लांट) हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबविला जात असून माथेरानच्या मुख्य बाजार पेठेतील रस्त्यांवर खोदकाम करून पाईप जोडण्या केलेल्या आहेत. खोदकाम करताना या मुख्य रस्त्यावरील क्ले-पेव्हर ब्लॉक्स काढण्यात आले होते. आता नाताळ हंगाम सुरू होणार असल्याने येणाऱ्या पर्यटकांना आणि स्थानिक नागरिकांना येथे कोणताही त्रास होऊ नये याकरिता काढलेले पेव्हर ब्लॉक रस्त्याला पुन्हा योग्य पद्धतीने लावून मुख्य रस्ता सुस्थितीत करण्यात येत आहे.

माथेरान पर्यटनस्थळ हे उंच डोंगरमाथ्यावर असल्याने याठिकाणी मोठया प्रमाणावर पर्जन्यवृष्टी होत असते. मुसळधार पावसात येथील रस्त्यांची धूप होऊ नये येथील रस्ते सुस्थितीत राहावे याकरिता येथील अनेक रस्त्यांना सनियंत्रण समितीच्या परवानगीने क्ले-पेव्हर ब्लॉक लावण्यात आले आहेत.

हे क्ले-पेव्हर ब्लॉक लावल्यामुळे या ठिकाणी येणाऱ्या पर्यटकांना तर येथील स्थानिकांना, वयोवृद्ध मंडळींना चालणे खूपच चांगले झाले आहे. त्याचबरोबर रस्त्यांची धूपदेखील थांबली आहे. सध्या माथेरान शहरात महत्वकांक्षी असा मलनिस्सारण प्रकल्प राबविला जात आहे. पाईपलाईन टाकण्याकरिता येथे मुख्य रस्त्याची खुदाई करण्यात आली असून रस्त्याचे क्ले-पेव्हर ब्लॉक या ठिकाणी काढण्यात आले होते.

आता पुढील आठवड्यापासून नाताळ हंगाम सुरू होत आहे. त्यामुळे मुख्य रस्त्यावर ठेकेदारामार्फत क्ले-पेव्हर ब्लॉक बसविण्याचे काम युद्धपातळीवर सुरू असून रस्ता सुस्थितीत केला जात आहे.

# बांगडा मासा लज्जतदार व पौष्टिक!

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

बांगडा मासा हे समुद्रातील एक अत्यंत चवदार आणि पौष्टिक मासा आहे. याला तेल बांगडा म्हणून ओळखले जाते. बांगड्याचा मसालेदार फ्राय, उकड किंवा आंबट कालवण हे सगळेच लोकांच्या जिभेवर ताजे रंग चढवणारे पदार्थ आहेत. फुललेल्या आणि तेलात तळलेल्या बांगड्याच्या चवीचा काय सांगावा! त्याची चव, खास करून कालवणात वाढवलेली, एकदम अप्रतिम लागते.

बांगडा मासा मुख्यत: समुद्राच्या किनाऱ्यावरील बाजारात, विशेषतः कोकण किनारा, महाराष्ट्र, गोवा, गुजरात व केरळ अशा ठिकाणी सहजपणे मिळतो. या माशाचे प्रमुख गाळे व उत्पादन केंद्रे भारतात दक्षिण आणि पश्चिम किनाऱ्यावर आहेत.

बांगड्याची किंमत बाजारात स्थानानुसार बदलते. साधारणपणे २०० रुपये ते ४५० रुपये किलो दर असतो, पण हंगामानुसार आणि ताजेपणावर ही किंमत कमी-जास्त होऊ शकते. ताज्या बांगड्याला बाजारात मोठा मागणी असतो, ज्यामुळे त्याची किंमत थोडीशी वाढते.

बांगडा मासा प्रथिनांचा चांगला स्रोत आहे. ह्यामुळे शरीराच्या मसल्स वाढवण्यासाठी आणि डिमेज्ड टिशूंच्या पुनर्निर्माणासाठी मदत होते. हे खाल्याने हृदयाच्या आरोग्याला लाभ होतो आणि रक्तदाब कमी होण्यास मदत होते. ह्या माशामध्ये हाडांच्या मजबुतीसाठी आवश्यक असलेला व्हिटॅमिन डी आणि कॅल्शियमही असतो.

तेल बांगड्यामध्ये अल्फा-लिनोलेनिक ॲसिड असतो, जो शरीराच्या विविध कार्यांसाठी महत्त्वाचा असतो. बांगड्याचा मासा मेंदूला उत्तेजन देतो आणि मानसिक आरोग्यासाठी मदत करतो



त्या शिवाय मास्यातील ओमेगा-३ फॅटी ॲसिड्स रक्तातील साखरेचे स्तर नियंत्रणात ठेवण्यास मदत करत असते. हृदयाच्या स्वास्थ्यासाठीदेखील बांगड्याच्या मास्याचा उपयोग फायदेशीर असतो, कारण त्यात डीएचए आणि ईपीए सारख्या फॅटी ॲसिड्स असतात, जे हृदयाला ताजेतवाने ठेवतात.

### आरोग्यासाठी वर्धक

***बांगडा मासा चवदार असण्यासोबतच आपल्या आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर आहे. आपल्या डाएटमध्ये या मास्याचा समावेश केल्याने फक्त चवीला आनंद मिळत नाही, तर शारीरिक स्वास्थ्यही वाढते. बांगडा खाण्याचे फायदे अनेक आहेत. त्याचे औषधी गुण, पोषणदृष्ट्या महत्त्व, आणि आरोग्यसंपन्नतेसाठी महत्त्वपूर्ण आहे.***

# कमळ सेवा संस्थेतर्फे पोळी-भाजी केंद्र

**अलिबाग : प्रतिनिधी**

कमळ सेवा संस्थेतर्फे अलिबाग येथे पोळी-भाजी केंद्र सुरू करण्यात आले आहे. सोमवारी (दि.१६) या फिरत्या पोळी-भाजी केंद्राचे उद्घाटन अथर्व सतीश धारप यांच्या हस्ते करण्यात आले.

पोळी-भाजी केंद्राच्या उद्घाटनावेळी कमळ सेवा संस्थेचे अध्यक्ष राजेश प्रधान, कमळ पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष गिरीश तुळपुळे, कमळ संस्थेचे अध्यक्ष नंदकुमार चाळके, संचालक मोरेश्वर दातार, लक्ष्मण जुंधारे, सतीशचंद्र पाटील, श्रीनिवास पाटील, कौस्तुभ कुलकर्णी, गीतांजली ओक,उपमहाव्यवस्थापक रंजन पाटील आणि अन्य अधिकारी तसेच कर्मचारी वर्ग उपस्थित होते.




फिरत्या वाहनातून गरजूना पोळी-भाजी पुरविण्यात येणार आहे. या केंद्रात नागरीकांना अल्प दरात पोळी-भाजी मिळणार आहे.कमळ पतसंस्थेने आर्थिक क्षेत्रात अनेक मापदंड पुर्ण केले आहेत. संस्थेने सामाजिकतेचे भान लक्षात ठेवून आरोग्याशी निगडीत कमळ सेवा संचालित डायलिसिस सेंटर २७ जानेवारी २०२४ रोजी सुरू करण्यात आले.

अलिबाग तालुक्यातील रूग्णांना उपचाराकरीता बाहेर जावे लागत असे त्यांची गरज लक्षांत घेऊन कमळ पतसंस्थेच्या माध्यमातून डायलिसिस सेंटरची निर्मिती करण्यात आली आणि आज अनेक रुग्ण ह्या सुविधेचा लाभ घेत आहेत. त्याचबरोबर अलिबाग तालुक्यात देऊळ भेरसे येथे गीर गाईचे संवर्धन व संगोपन करण्याचा उपक्रम गेल्या पाच वर्षांपासून सहयोग गोपालन व गोसंर्वधन या संस्थेमार्फत अंगिकारला आहे.

# मुरूडमध्ये होणार दत्तयाग, लघुरूद्र

**मुरूड : प्रतिनिधी**

श्री दत्त देवस्थान ट्रस्ट मुरूड-जंजिरा यांच्या वतीने मंगळवारी (दि.२४) श्रीदत्त मंदिरात श्री दत्तयाग व लघुरुद्र कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.


सकाळी ६ वाजता श्री दत्तयाग व लघुरुद्र, दुपारी १२ वाजता महाआरती, दुपारी १२.३० ते ३ महाप्रसाद, सायंकाळी ६ वाजता भव्य भजनाचे कार्यक्रम आयोजन करण्यात आले आहे. सर्व भाविकांनी श्री दत्तयाग व लघुरुद्र व महाप्रसादाचा आवश्यक लाभ घ्या, असे आवाहन श्री दत्त देवस्थान ट्रस्ट मंडळ मुरूड जंजिरा व कार्यकारीणी सदस्य, श्री दत्त देवस्थान पुजा समिती, उत्सव समिती, दत्तयाग व लघुरुद्र समिती यांनी केले आहे.

मुरूड शहरापासून श्री दत्तमंदिर उंच डोंगरावर असल्याने महिला -पुरुष वृध्द, बालकांना श्री दत्तयाग व लघुरुद्र व महाप्रसादाचा लाभापासून कोणी वंचित राहू नये त्याकरिता श्री दत्त देवस्थान ट्रस्ट मुरूड जंजिरातर्फे सर्व दत्त भक्तांना मोफत मिनिडोअर गाडीची सोय करण्यात आली आहे.

# वर्षा अखेरच्या संकष्ट चतुर्थीला वरदविनायकाच्या दर्शनासाठी गर्दी

**चौक : प्रतिनिधी**

२०२४ डिसेंबर महिना २०२४ वर्षातली आजची संकष्टी चतुर्थीला अष्टविनायक क्षेत्र महड येथे भक्तांनी वरदविनायक गणपतीच्या दर्शनाला गर्दी केली होती.



आजची संकष्ट चतुर्थी ही सन २०२४ सालातील वर्ष अखेरची शेवटची. त्यामुळे राज्यातील वेगवेगळ्या भागातून अनेक भाविक दर्शनाला आले होते. त्यातच मार्गशीर्ष हा पवित्र महिना सूरू आहे. या महिन्यात भाविक देवदर्शन करण्यास बाहेर पडतात. या महिन्यात शैक्षणिक सहली आयोजित करण्यात येतात. त्यामुळे शाळा, कॉलेज यांचे विद्यार्थी यांचीही संख्या लक्षणीय होती. येणाऱ्या भाविकांना पार्किंग व्यवस्थाची सुविधा नाही. ही बाब दुरून येणाऱ्या भाविकांना त्रासदायक असल्याचे दिसून येते.

अष्टविनायक क्षेत्र महड हे स्थान पुणे मुंबईदरम्यान जवळ असल्याने तेथील भक्तगण जास्त दिसत होते. रायगड जिल्हा, नवी मुंबई, लोणावळा येथील भाविक यांचीही गर्दी होती.

# 'वेडे चाळे'वीरांची कला

**सुधागड : रामप्रहर वृत्त**

सुधागड तालुक्यातील वेडे चाळे या यू-ट्यूबर्स आणि रीलस्टार्सनी तालुक्याला नवी सांस्कृतिक ओळख मिळवून दिली आहे.

कोरोना काळात अमित निंबाळकर, प्रवीण पालकर, तुषार ठोब्रे, अभिजित ठोंबरे या चौकडीने १००पेक्षा जास्त यू-ट्यूब व्हिडीओ आणि रील तयार करून आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांनी सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, अंधश्रद्धा निर्मूलन अशा विविध विषयांवर जनजागृती केली आहे.

'वेडे चाळे'च्या करामतींनी संपूर्ण रायगड जिल्हासह राज्यभर सुधागडची कला उंचावर नेली आहे. अशा कलाकारांना व्यासपीठ मिळावे, जेणेकरुन त्यांच्या कलेला प्रोत्साहन देता येईल.



# माथेरानमधील प्रेक्षणीय स्थळांकडील पथदिवे सुरू करण्याची मागणी

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरानमधील प्रेक्षणीय स्थळांकडे जाणारे रस्त्यावर विजेचे दिवे बंद असल्याने पर्यटनावर परिणाम होण्याची शक्यता आहे. याकरिता माथेरानमधील सामाजिक कार्यकर्ते राकेश कोकळे यांनी नगरपालिका मुख्याधिकारी यांना भेटून निवेदन सादर केले आहे.

माथेरान या थंड हवेच्या ठिकाणी वर्षभर पर्यटक येत असतात. मागील काही वर्षात वाढलेल्या पर्यटकांमुळे माथेरानमध्ये आर्थिक सुबत्ता आलेली दिसून येत आहे त्यात



माथेरानच्या पर्यटन हंगामातील सर्वात महत्त्वाचे पर्यटन हंगाम नाताळ आणि सरत्या वर्षाला निरोप तसेच नवीन वर्षाचे स्वागत असा महत्वाचा पर्यटन हंगाम जवळ आला आहे, मात्र शहरातील प्रेक्षणीय स्थळाकडे जाणारे रस्ते आणि त्या रस्त्यांवर लावण्यात आलेले दिवे बंद आहेत. त्यामुळे सूर्यास्तानंतर माथेरान मध्ये येणाऱ्या पर्यटकांना रात्रीच्या वेळी त्या अंधारातून वाट काढताना अडचणी येत आहेत. त्यात पर्यटक हे रस्त्यांतून जाताना मोबाईलच्या टॉर्चचा वापर होताना दिसत आहे. त्यातच रस्त्यावर असलेले खड्डे हे येथील पर्यटनासाठी डोकेदुखी ठरत आहेत.

माथेरानमधील सामाजिक कार्यकर्ते राकेश कोकळे यांनी माथेरान नगरपालिकेला निवेदन देऊन शहरातील प्रेक्षणीय स्थळांकडे जाणारे रस्ते सुधारण्याची मागणी केली आहे.

# थंडीच्या दिवसांत पेटू लागल्या शेकोट्या; गारव्यामध्ये रंगाहेत गप्पांचे फड

**माणगाव : प्रतिनिधी**

पावसाळा संपता संपता वेध लागतात ते हिवाळ्याचे आणि गुलाबी थंडीचे. हिवाळ्याच्या दिवसात सकाळी सकाळी पडणारे दाढ धुके आणि बोचणारी थंडी सर्वांना हवीहवीशी वाटते. या थंडी बरोबरच उबदार कपडे आणि चौकातून, घराबाहेर, घरांच्या कोपऱ्यांवर उब देण्यासाठी केलेल्या शेकोट्या आणि त्यांच्या भोवती गोलाकार बसून शेकोटीचा आनंद घेणारे नागरिक गेल्या काही दिवसांपासून सर्वत्र दिसू लागले आहेत.

गेल्या काही दिवसांपासून गारवा वाढत चालल्याने अनेक ठिकाणी शेकोट्या दिसू लागल्या आहेत. गारवा वाढत जाईल तसे शेकोट्या भोवती गर्दी वाढत जाणार आहे. या शेकोट्यांमुळे गप्पांचा फड रंगू लागला असून मनोरंजन होते आहे. अडगळीतील लाकडे, पाळा पाचोळा, टाकाऊ कागद, पुठ्ठे इत्यादींचा वापर करून या शेकोट्या केल्या जातात. अनेक ठिकाणी हिवाळ्यासाठी खास मोठे लाकूड, ओंडके शेकोटी करिता



ठेवले जाते. दररोज ते पेटवून शेकोटी केली जाते. लहान मुले, स्त्री-पुरुष, वृद्ध,तरुण सर्वजण या शेकोट्यांचा आनंद घेतात.

सार्वजनिक ठिकाणी, चौक या ठिकाणी तर आवर्जून शेकोट्या केल्या जातात. सकाळी साधारणता साडेसात, आठ वाजेपर्यंत अगदी सूर्याची किरणे जाणवेपर्यंत शेकोटीचा आनंद घेतला जातो. तसेच रात्रीही जेवणानंतर अनेक ठिकाणी शेकोटचानभोवती उबदारपणा घेतला जाऊ लागला आहे.

हिवाळा आणि शेकोटीचा हा कार्यक्रम सर्वांच्या जीवनातील आनंदाचा भाग असून गाणी, गप्पा, विनोद आणि मनोरंजनाची वेगळी अशी पर्वणी या निमित्ताने सर्वांना मिळते आहे. ठराविक गावाचे नाव घेऊन त्या गावचा म्हातारा शेकोटीला आला असे गीत हमखास या शेकोटी मधून ऐकायला मिळते.

शेकोटीची ही संकल्पना प्राचीन असून शेकोटी आणि हिवाळा हे नाते अधिक घट्ट होत आहे. आमच्या लहानपणापासून सर्वजण हिवाळ्यामध्ये शेकोटीचा आनंद घेत आलो आहोत. हिवाळा आणि शेकोटी यामधून अनेक आठवणी आहेत. थंडीच्या दिवसांत शेकोटी करण्याची मजा काही औरच असते.

> **आजकाल व्यस्त जीवनामुळे शेकोटीचा कार्यक्रम दुर्मीळ होत असला तरी थंडीच्या दिवसात शेकोटीभोवती बसणे हा आनंदाचाच भाग असतो.**
> **-राज पतारे, शेकोटीप्रेमी**

> **थंडीच्या दिवसांत उबदारपणासाठी पेटविल्या जाणाऱ्या शेकोट्या ही बाब नित्याची असून यामुळे मित्र मंडळ परिवार एकत्र येऊन गप्पांचा मनमुराद आनंद घेतात. यामुळे मैत्रभाव वाढीस लागतो, मनोरंजन होते. व्यस्त राहण्याच्या या काळात शेकोटीमुळे माणसे एकत्र येतात ही बाब समाज हितासाठी चांगली आहे.**
> **-सुमित मोंडे, सामाजिक कार्यकर्ता**

# जयपूरचा बंगळुरूवर शानदार विजय



प्रो कबड्डी लीग

**पुणे : प्रतिनिधी**

जयपूर पिंक पँथर्सने बंगळुरू बुल्सवर ३६-२६ असा शानदार विजय मिळविला आणि प्रो कबड्डी लीगमध्ये प्ले ऑफच्या दिशेने वाटचाल कायम ठेवली. मध्यंतराला त्यांच्याकडे १५-११ अशी आघाडी होती. हीच आघाडी त्यांच्या दृष्टीने महत्त्वाची ठरली.

श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल म्हाळुंगे बालेवाडी येथील बॅडमिंटन हॉलमध्ये सुरू असलेल्या या स्पर्धेत जयपूर व बंगळुरू यांच्यातील सामन्यात सुरुवातीपासूनच चुरस निर्माण झाली होती. जयपूर संघाने सुरुवातीपासूनच आघाडी घेण्यावर लक्ष केंद्रित केले होते. खोलवर चढाया व अचूक पकडी यावर त्यांनी जास्त भर दिला. मध्यंतराला त्यांनी १५-११ अशी आघाडी घेतली होती.

उत्तरार्धात सुरुवातीलाच बंगळुरूने लागोपाठ चार गुणांची कमाई करीत १५-१५ अशी बरोबरी साधली. सामन्याच्या तिसाव्या मिनिटाला जयपूर संघाने १८-१७ अशी एक गुणाची आघाडी मिळविली होती. सामन्याच्या ३१व्या मिनिटाला त्यांनी लोण चढवत आपली आघाडी आणखी वाढवली. शेवटची पाच मिनिटे बाकी असताना त्यांच्याकडे २८-११ अशी आघाडी होती. त्यानंतर लगेच त्यांनी लोण चढविला आणि आपली बाजू बळकट केली.

ही स्पर्धा दोन वेळा जिंकणाऱ्या जयपूर संघाकडून या सामन्यात अर्जुन देशवाल व सोमबीर मेहरा यांनी पल्लेदार चढाया केल्या. अर्जुनने आपले नाव सार्थक ठरविताना एकाच चढाईत तीन गडी बाद करण्याची किमयाही दाखवून दिली. बंगळुरू संघाकडून अजिंक्य पवार व परदीप नरवाल यांचा खेळ कौतुकास्पद होता.

## धावपटू शौर्या आंबुरेला सुवर्णपदक

**ठाणे : प्रतिनिधी**

ठाण्याची शौर्या आंबुरे कोच हिने ओडिशातील भुवनेश्वर येथे आयोजित ३९व्या नॅशनल ज्युनियर ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये ६० मीटर व ८० मीटर अडथळा शर्यतीत मुलींच्या अंडर-१६ गटात सुवर्णपदक पटकावले आहे, तर मेडले रिलेमध्ये महाराष्ट्राचा संघाला रौप्यपदक मिळवून देण्यात शौर्याचा मोलाचा वाटा आहे.

शौर्याने ६० मीटर शर्यतीत ७.६० सेकंद वेळ नोंदवून नवीन राष्ट्रीय आणि स्पर्धेचा विक्रम प्रस्थापित केला, जो आधीचा ७.७७ सेकंदाचा विक्रम होता. या कामगिरीसाठी शौर्याला राष्ट्रीय स्पर्धेचा उत्कृष्ट खेळाडूचा पुरस्कार देण्यात आला.

शौर्या ही युनिव्हर्सल हायस्कूल ठाणे या शाळेची विद्यार्थिनी असून अजित कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण घेत आहे. शौर्याचे आई-वडील दोघेही डीएसपी असून त्यांचे नेहमीच तिला प्रोत्साहन व सहकार्य मिळते.

## जिल्हास्तरीय महिला कबड्डी स्पर्धेत किहीम संघ विजेता

**रेवदंडा : प्रतिनिधी**

वाडगाव येथे स्व. काशिनाथ भगत व स्व. बाळू थळे स्मृतिचषक जिल्हास्तरीय महिला कबड्डी स्पर्धा झाली. या स्पर्धेत भिल्लेश्वर किहीम संघाने विजेतेपद पटकाविले.

वाडगाव ग्रामस्थ आणि राष्ट्रवादी काँग्रेस तालुका अध्यक्ष जयेंद्र भगत यांच्या विद्यमाने रसानी टेकडी मैदानात स्पर्धा खेळली गेली. या स्पर्धेचा शुभारंभ माजी जि.प. सदस्य मानसी दळवी, शिवसेना महिला जिल्हा संघटक संजीवनी नाईक व अन्य मान्यवरांच्या हस्ते झाला. उद्घाटन समारंभास सरपंच सारिका पवार, माजी सरपंच सरिता भगत, सदस्य संतोष बोले, निलम थळे, रूपाली पाटील, अंजली भगत, प्रमिला खुले, संजना नाईक आदी उपस्थित होते.



स्पर्धेत दत्तात्रेय स्पोर्ट्स पनवेल संघाने द्वितीय, सोनारसिद्ध धाटाव तृतीय आणि दिलखुश आवास संघाने चतुर्थ क्रमांक मिळवला. उत्कृष्ट खेळाडू हर्षदा परार (पनवेल), उत्कृष्ट चढाईपटू चैत्राली पाटील (किहीम), उत्कृष्ट पकडपटू सिद्धी नाखवा (आवास), पब्लिक हिरो म्हणून तन्वी पडवळ (धाटाव) हिची निवड करण्यात आली. विजेते संघ व वैयक्तिक चमकदार कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

या स्पर्धेचे पारितोषिक वितरण समारंभ ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. प्रसाद पाटील, स्पर्धेचे आयोजक राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष जयेंद्र भगत, गणपत पवार, चंद्रकांत ठाकूर, शैलेश मगर, नंदकुमार म्हात्रे, प्रसाद पाटील, नरेश थळे आदींच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

स्पर्धेत गुणलेखन अविनाश गोंधळी, पंचाचे काम रूपाली मोकल, निकेश पवार, रंजित तुणतुणे, सतिश भगत यांनी, धावते वर्णन व सूत्रसंचलन रवींद्र ठाकूर, सुनील थळे व प्रवीण भगत यांनी केले.

# श्रीराम, दुर्गामाता, गुड मॉर्निंग, जय भारत संघ उपांत्यपूर्व फेरीत

कबड्डी महोत्सव

**मुंबई : प्रतिनिधी**

श्रीराम क्रीडा विश्वस्त, दुर्गामाता स्पोर्टस्, गुड मॉर्निंग, जय भारत यांनी प्रथम श्रेणी पुरुष गटाच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. बळीराम क्रीडा मंडळाने ५१व्या कबड्डी महोत्सवानिमित्त काळाचौकी येथील बळीराम मंडळाच्या पटांगणावर या स्पर्धेचे आयोजन केले आहे.



पुरुषांच्या दुसऱ्या फेरीच्या सामन्यात श्रीराम क्रीडा विश्वस्त मंडळाने विजय नवनाथ मंडळाचा प्रतिकार ३६-२३ असा मोडून काढत उपांत्यपूर्व फेरी गाठली. पूर्वार्धात १४-१८ असे पिछाडीवर पडलेल्या श्रीराम संघाने उत्तरार्धात दोन लोण देत व एक अव्वल पकड करीत बाजी पलटविली. तुषार शिंदे, अंकुश पार्ले यांच्या तुफानी चढाया, त्याला आदित्य पार्लेची मिळालेली पकडीची भक्कम साथ त्यामुळे श्रीरामने हा मोठा विजय प्राप्त केला. विजय नवनाथचे तेजस वर्दम, हर्ष लाड यांचा खेळ उत्तरार्धात पूर्ण ढेपाळला.

दुर्गामाता स्पोर्टस्ने विजय बजरंग व्यायाम शाळेला ४२-२९ असे लोळविले. पहिल्या डावात दोन लोण देत २५-०८ अशी मोठी आघाडी घेणाऱ्या दुर्गामाताने दुसऱ्या डावात मात्र सावध पवित्र घेतला. याचा फायदा घेत विजय बजरंगने लोणची परत फेड करीत आघाडी कमी केली. पण विजयापासून ते वंचित राहिले. रूपेश महावरे, अमित माने, क्षितिज इंगळे दुर्गामाता कडून, तर सिद्धेश खांडेकर, अविनाश पाटील विजय बजरंगकडून उत्कृष्ट खेळले. जय भारत मंडळाने सूर्यकांत व्यायाम शाळेचा प्रतिकार ३०-२० असा मोडून काढला. विश्रांतीला १६-०९ अशी आघाडी घेणाऱ्या जय भारतने नंतरदेखील तोच जोश कायम राखत विजयाला गवसणी घातली. निखिल पाटील, सिद्धेश सावंत यांच्या झंझावाती चढाया त्यांना साहिल डगरे याची मिळालेली पकडीची साथ यामुळे हे शक्य झाले. सूर्यकांतकडून सिद्धेश आडे, प्रतिक तळेकर यांनी उत्कृष्ट लढत दिली.

शेवटच्या सामन्यात गुड मॉर्निंगने यश मंडळाचा ४३-२५ असा सहज पाडाव केला. मध्यांतराला २८-१० अशी आघाडी घेणाऱ्या गुड मॉर्निंगने पूर्ण डावात दोन लोण, चार बोनस व तीन अव्वल पकडीची नोंद केली. शार्दुल पाटील, प्रफुल्ल कदम यांच्या दमदार चढाया, तर साहिल राणे, सतीश पांचाळ यांचा भक्कम बचाव याला या विजयाचे श्रेय जाते. यश मंडळाचा राज खोत चमकला.

# हैदराबाद संघाच्या फलंदाजी प्रशिक्षकपदी योगेश पवार

**अलिबाग, खोपोली : प्रतिनिधी**

संपूर्ण देशभरात सध्या सुप्रसिद्ध असलेली इंडियन स्ट्रीट प्रीमियर लीग (आयएसपीएल) टेनिस बॉल टी-१० (पर्व दुसरे) क्रिकेट स्पर्धा काही दिवसांतच सुरू होणार आहे. या स्पर्धेत सहभागी असलेल्या फाल्कन राइजर्स हैदराबाद संघाच्या फलंदाजीच्या प्रशिक्षकपदी रायगड जिल्ह्यातील पेणचा दमदार फलंदाज माजी रणजीपटू योगेश पवार यांची निवड करण्यात आली आहे.





योगेश पवार हे महाराष्ट्राच्या संघासाठी रणजी ट्रॉफी सामने खेळले आहेत. एक दमदार डावखुरा फलंदाज म्हणून पवार यांची ख्याती संपूर्ण महाराष्ट्रात आहे. ते सध्या डॉ. डी.वाय. पाटील क्रिकेट क्लबकडून टाइम्स शिल्ड, कांगा लीगसारख्या लेदर बॉल क्रिकेट स्पर्धा खेळत आहेत तसेच डी.वाय. पाटील क्रिकेट अकॅडमी, तेंडुलकर्स एसआरटी १० क्रिकेट स्पोर्ट्स फाऊंडेशनसाठी प्रशिक्षक म्हणून कार्यरत आहेत.

यंदाची आयएसपीएल ही ठाणे येथील दादोजी कोंडदेव स्टेडियमवर खेळवली जाणार आहे. क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर या स्पर्धेचे कोअर कमिटी मेंबर म्हणून काम करीत आहे.

योगेश पवार यांची फाल्कन राइजर्स हैदराबाद संघाच्या फलंदाजीच्या प्रशिक्षकपदी निवड झाल्याबद्दल डी.वाय. पाटील ग्रुपचे अध्यक्ष डॉ. विजय पाटील, रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील यांच्यासह जिल्हातील क्रिकेटप्रेमींनी पवार यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

# चॅम्पियन्स ट्रॉफीबाबत अधिकृत घोषणा



**दुबई : वृत्तसंस्था**

आयसीसीने चॅम्पियन्स ट्रॉफीबाबत अधिकृत घोषणा केली आहे. चॅम्पियन्स ट्रॉफीचे यजमानपद पाकिस्तानकडे आहे, ज्यासाठी भारतीय संघाने पाकिस्तानमध्ये जाऊन सामने खेळण्यास नकार दिला होता, पण आता दोन्ही क्रिकेट बोर्डांनी हायब्रिड मॉडेलवर सहमती दर्शविली आहे. आयससीच्या मते पुढील चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धा पाकिस्तानमध्ये आणि तटस्थ ठिकाणी खेळवली जाईल.

चॅम्पियन्स ट्रॉफीचे वेळापत्रक लवकरच जाहीर करण्यात येणार असल्याची माहिती आयसीसीने दिली आहे, मात्र भारतीय संघ चॅम्पियन्स ट्रॉफीचे सामने कोणत्या देशात आणि कोणत्या ठिकाणी खेळणार हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. स्पर्धा १९ फेब्रुवारीपासून सुरू होणार आहे, पण ठिकाणांच्या अनिश्चिततेमुळे स्पर्धेचे वेळापत्रक अद्याप जाहीर करण्यात आलेले नाही. विशेष म्हणजे या स्पर्धेत आठ संघ सहभागी होणार असून त्यांची दोन गटात विभागणी करण्यात आली आहे. प्रत्येक गटातील अव्वल दोन संघ उपांत्य फेरीत पोहचतील.

आयसीसी बोर्डाने सांगितले की, २०२४-२०२७च्या सायकलदरम्यान कोणत्याही देशाने आयोजित केलेल्या कार्यक्रमांमध्ये भारत आणि पाकिस्तानचे सामने तटस्थ ठिकाणी खेळवले जातील. हा नियम आता आगामी आयसीसी पुरुष चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ (पाकिस्तान आयोजित)साठी लागू होईल, जी फेब्रुवारी ते मार्चदरम्यान खेळवली जाईल आणि महिला क्रिकेट विश्वचषक २०२५ (भारताद्वारे आयोजित), पुरुष टी-२० विश्वचषक २०२६ (भारत आणि श्रीलंकेद्वारे आयोजित) यांनादेखील लागू होईल. याचबरोबर २०२८च्या महिला टी-२० विश्वचषकाचे यजमानपदही पाकिस्तानकडे देण्यात आले आहे.

आयसीसीच्या अधिकृत घोषणेसह भारत आणि पाकिस्तान यांच्यातील चॅम्पियन्स ट्रॉफीबाबत दीर्घकाळापासून सुरू असलेला वाद संपुष्टात आला असून आता चाहत्यांना स्पर्धेच्या वेळापत्रकाची प्रतीक्षा आहे.

## टीम इंडियात होणार बदल

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघ सध्या ऑस्ट्रेलियाविरुद्ध बॉर्डर-गावसकर ट्रॉफी खेळण्यात व्यस्त आहे. मालिकेतील तिसऱ्या सामन्यानंतर रविचंद्रन अश्विनने आंतरराष्ट्रीय क्रिकेटला अलविदा केला. चाहत्यांना आणखी एक मोठा धक्का लागू शकतो.



इंग्लंडविरुद्धच्या पुढील कसोटी मालिकेपूर्वी टीम इंडियाच्या कसोटी संघात आणखी अनेक मोठे बदल पाहायला मिळू शकतात.

भारतीय कसोटी संघात असे अनेक खेळाडू आहेत जे सतत खेळत आहेत, मात्र असे असूनही त्याची कामगिरी काही विशेष झाली नाही. अशा परिस्थितीत कदाचित आगामी काळात या फॉरमॅटला अन्य कोणी खेळाडूही अलविदा म्हणणार असतील, तर चाहत्यांना त्यासाठी तयार राहावे लागेल. मीडिया रिपोर्ट्सनुसार, इंग्लंडविरुद्धच्या पुढील कसोटी मालिकेपूर्वी भारताच्या कसोटी संघात मोठे बदल अपेक्षित आहेत. रविचंद्रन अश्विनची निवृत्तीची घोषणा ही त्याची सुरुवात मानली जात आहे. बॉर्डर-गावसकर ट्रॉफीनंतर इंग्लंडच्या भारत दौऱ्याची सुरुवात २२ जानेवारीपासून होणाऱ्या पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेने होणार आहे. यानंतर दोन्ही संघ तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेत आमनेसामने येतील. यानंतर पाच सामन्यांची कसोटी मालिकाही होणार आहे.

# निवृत्त अश्विनचे मायदेशी स्वागत





**चेन्नई : वृत्तसंस्था**

आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त झालेला भारताचा दिग्गज फिरकीपटू रविचंद्रन अश्विन गुरुवारी (दि. १९) मायदेशी परतला. त्याच्या स्वागतासाठी चेन्नई विमानतळावर पत्नी आणि दोन मुलीही उपस्थित होत्या. यानंतर अश्विनच्या चेन्नईमधील घरीही त्याचे जोरदार स्वागत झाले.

ब्रिस्बेनमधील सामना संपल्यानंतरच अश्विन भारतासाठी रवाना झाला. यानंतर प्रदीर्घ प्रवासानंतर तो गुरुवारी सकाळी चेन्नई विमानतळावर उतरला. यानंतर अश्विन काळ्या रंगाच्या व्हॉल्वोमध्ये बसून घराकडे निघाला.

अश्विनच्या स्वागतासाठी घरी विशेष तयारी करण्यात आली होती. सोसायटीतील लोक, आई-वडील, मित्रपरिवार आधीच वाट पाहत होते. अश्विन गाडीतून बाहेर येताच वडील घराबाहेर आले आणि त्याला पाहताच त्यांनी मिठी मारली. त्याची आई खूपच भावूक दिसत होती. लेकाला मिठी मारताच आईला अश्रू अनावर झाले. सोसायटीतील लोकांनी त्याला हार घालून त्याचे स्वागत केले. या वेळी काही चाहतेही उपस्थित होते. त्यांनी त्याचा ऑटोग्राफ घेतला.

रवीचंद्रन अश्विनने १४ वर्षांच्या प्रदीर्घ कारकिर्दीला निवृत्ती जाहीर करत पूर्णविराम दिला. अश्विनने बॉर्डर-गावसकर ट्रॉफीच्या मध्यातच निवृत्ती जाहीर केली आहे.





दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com